किंमत रु. ३०
पृष्ठे ४४

# जीवन शिक्षण

ऑगस्ट २०२०







राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र




शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व गुगल यांच्यामार्फत राज्यातील शाळांसाठी गुगल क्लासरूम प्रकल्पाचे उद्घाटन दि. ६ ऑगस्ट २०२० रोजी मा. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते आणि मा. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री व मा. प्रा. वर्षाताई गायकवाड, मंत्री, शालेय शिक्षण यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.




मा. प्रा. वर्षाताई गायकवाड, मंत्री, शालेय शिक्षण यांच्या प्रमुख उपस्थितीत 'लॉकडाऊन मधील शिक्षण' या विषयावर राज्यातील शिक्षकांनी केलेल्या उपक्रमांचे सादरीकरण.




राज्यातील शाळाबाह्य, स्थलांतरित विद्यार्थ्यांसंदर्भात 'कोरोना काळातील आव्हाने व पुढील दिशा' या विषयावर बालरक्षकांना संबोधताना दिनकर पाटील, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६४ | ऑगस्ट २०२० | अंक ५ वा

❖ प्रवर्तक :
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन

❖ प्रकाशक :
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ प्रकाशन सल्लागार समिती :
दिनकर पाटील
*संचालक तथा संपादक* — अध्यक्ष
विकास गरड, *प्र. प्राचार्य* — सदस्य
डॉ. कमलादेवी आवटे, *प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.* — सदस्य
श्रीम. अश्विनी मुसळे-काळसर्पे
*सहा. संचालक, लेखा* — सदस्य
दत्तात्रय थिटे, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. — सदस्य
श्रीम. वर्षाराणी भोपळे, *वरिष्ठ अधिव्याख्याता* राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. — सदस्य

❖ निर्मिती सहायक : डॉ. किरण धांडे
*वरिष्ठ अधिव्याख्याता, प्रसार माध्यम* — सदस्य-सचिव

❖ मुखपृष्ठ व अंतरंग सजावट :
नूतन क्षीरसागर, *आर्टिस्ट कम टेक्निशियन*

❖ मुद्रक : रुना ग्राफिक्स, सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ प्रती : -

❖ मूल्य : रु. ३०/-  वार्षिक वर्गणी रु. ३००/-

## अंतरंग

| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ ऑनलाईन सोबत ऑफलाईन | संदीप वाक्चौरे | ५ |
| ❖ कानेगावातील ऑफलाईन शिक्षण | सुशीलकुमार पांचाळ | ८ |
| ❖ ऑफलाईन आणि ऑनलाईन शिक्षणाचा सुरेख मेळ... | संजय जगताप | १० |
| ❖ शाळेचे प्रयत्न व समाजाची साथ | प्रमोद बोरकर | १२ |
| ❖ सावध तो सुखी | अरुण जाधव | १५ |
| ❖ केबल चॅनलद्वारे शिक्षण : राज्यातील पहिला प्रयोग | अर्जुन कोळी | १७ |
| ❖ एक वाटचाल अद्भुत यशाची | अर्चना जिडकुंटावार | २० |
| ❖ Learning with Lockdown | मृणाल गांजाळे | २३ |
| ❖ वर्क फ्रॉम होम | डॉ. रविंद्र आंबेकर | २६ |
| ❖ व्हिज्युअल ते व्हर्च्युअल | अमर घाटगे | २९ |
| ❖ ऑफलाईन शिक्षणासाठी अभ्यास गट उपक्रम | विनीत पद्मवार | ३३ |
| ❖ तंत्रस्नेही शिक्षकांच्या कौशल्यांचे सक्षमीकरण | बी. बी. पाटील | ३५ |
| ❖ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षणाची संधी | विजया अवचार | ३८ |
| ❖ प्रिय संपादक | - | ४२ |

**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **फॅक्स नं. :** ०२०-२४४७७०९०. **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....



शिक्षक मित्रांनो,

१५ ऑगस्ट २०२० रोजी आपण स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशाने सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांमध्ये जागतिक पातळीवर विशिष्ट असे स्थान निर्माण केले आहे याचा आपल्याला निश्चितच आनंद आहे परंतु अजूनही आपल्याला सर्व घटकांच्या उन्नतीसाठी खूप काम करावे लागणार आहे. यामध्ये शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. संपूर्ण देशाचा विकास हा शिक्षणावर अवलंबून आहे. त्यामुळे सर्व घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून, त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. 'कोविड-१९' चा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झालेला असताना उद्भवलेल्या असाधारण परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी सर्व पातळ्यांवर प्रयत्न केले जात आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे, इंटरनेटच्या माध्यमातून शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले जात असले तरी सर्वदूर कनेक्टिव्हिटी असेलच अशी शक्यता नसल्याने ऑनलाईन शिक्षण देण्याच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. त्यामुळे ऑनलाईन बरोबरच ऑफलाईन शिक्षणाचा विचार केला तरच सर्व घटकांपर्यंत पोहोचणे शक्य आहे.

या महिन्याचा अंक आपल्या सर्वांसाठीच विशेष आहे कारण मा. प्रा. वर्षाताई गायकवाड, मंत्री शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी ऑनलाईन सोबत ऑफलाईन शिक्षण सुरू राहण्यासाठी शासन स्तरावरून सुरू असलेल्या प्रयत्नांबद्दल सविस्तर मत मांडले आहे. त्यांनी या अंकासाठी दिलेली मुलाखत आपल्या सर्वांना दिशादर्शक ठरणारी आहे. 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' ही अभ्यासमाला प्रत्येक शिक्षकांपर्यंत पोहोचविण्याचे काम आम्ही या स्तरावरून करीत आहोत पण तळागाळातील शिक्षकांनी त्या अभ्यासमालेला आपल्या विविधांगी प्रयत्नांतून प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी अविरत प्रयत्न सुरू ठेवले आहेत. याशिवाय राज्यामध्ये अनेक माध्यमांतून शिक्षणासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. डोंगराळ, दुर्गम आणि अदिवासी क्षेत्रांत जेथे ऑनलाईन शिक्षण पोहोचत नाही, तेथे अनेक स्वयंसेवी सेवकांबरोबरच शैक्षणिक संस्था, शिक्षक यांनी आपल्या कल्पकतेतून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षकांनी केलेले असे प्रयत्न 'जीवन शिक्षण'च्या या अंकामध्ये वाचायला मिळणार आहेत. आपल्यालाही याचा निश्चित उपयोग होईल आणि नवे काही करण्याची प्रेरणा मिळेल. सर्वांपर्यंत कोविडच्या काळात शिक्षण पोहोचविण्यासाठी या सगळ्यांचा नक्कीच उपयोग होईल.

स्वातंत्र्य दिन साजरा करीत असताना कोविडच्या परिस्थितीमध्ये स्वातंत्र्याचा नेमका अर्थही आपल्याला समजू लागलेला आहे. 'स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे' हे कळू लागले आहे म्हणून भारतीय घटनेतील स्वातंत्र्याचा नेमका अर्थ आता समजून घेऊ या.

स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



**दिनकर पाटील**
संपादक, जीवन शिक्षण

# ऑनलाईन सोबत ऑफलाईन

**संदीप वाक्चौरे**
विषय सहायक – जि. शि. व प्र. संस्था संगमनेर. जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी : ८३२९३२८४७०

**मुलाखत : मा. प्रा. वर्षाताई गायकवाड**
मंत्री, शालेय शिक्षण.

देशात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढला असतानाच, नव्या शैक्षणिक वर्षाला आरंभ झाला, मात्र प्रत्यक्षात औपचारिक शिक्षणासाठी वर्ग सुरू होऊ शकले नाहीत. त्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून दूर जाऊ नयेत याकरिता शासन स्तरावरून विविध प्रयत्न सुरू आहेत. त्या प्रयत्नांबरोबर राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आणि अनेक शिक्षकांनी नव्या वाटा धुंडाळल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून घेत शिक्षणसाठी अनेक प्रयत्न सुरू झाले आहेत, पण अडचणी येत आहेत. सुविधांना मर्यादा आहेत. त्यामुळे अशा परिस्थितीत ऑफलाईन स्वरूपात देखील शिक्षण सुरू राहण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. प्रशासनाचे विविध प्रयत्न जाणून घेण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री प्रा. ना. वर्षाताई गायकवाड यांच्याशी 'जीवन शिक्षण'च्या वाचकांसाठी संदीप वाक्चौरे यांनी साधलेला संवाद.



**प्रश्न : सध्याच्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण सुरू ठेवण्यात अनेक अडचणी येत आहेत. त्याकडे तुम्ही कसे पाहता?**

**उत्तर :** जगभरात कोरोनासारख्या महामारीने अनेक प्रश्न निर्माण केले आहेत. त्याचा परिणाम शालेय शिक्षणावर देखील झाला आहे. आरंभी मार्च महिन्यात लॉकडाऊन जाहीर झाल्यावर आपण काही काळ प्रतीक्षा केली. प्रादुर्भाव वाढत गेल्याने आपण शालेय स्तरावरील दुसऱ्या सत्राच्या परीक्षा रद्द करीत अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे निकाल जाहीर करण्यास सांगितले. त्यानंतर दहावीचा भूगोलाचा पेपर रद्द करावा लागला. परिस्थिती नियंत्रणात येईल असे वाटत असताना नवीन शैक्षणिक वर्ष नेहमीप्रमाणे जून महिन्यात सुरू केले. मात्र प्रादुर्भाव वाढत गेल्याने प्रत्यक्ष वर्ग अध्यापन सुरू होऊ शकले नाही. त्यामुळे शालेय शिक्षण विभागाला या परिस्थितीत पर्यायी मार्गांचा विचार करावा लागला. अर्थात अशा परिस्थितीत वर्ग सुरू करण्यात अडचणी होत्या आणि आहेत. प्रत्येक मूल आपल्यासाठी महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी कोणत्याच प्रकारे तडजोड केली जाऊ शकत नाही. त्यामुळे अडचणींवर मात करीत आपल्याला पुढे जावे लागणार आहे. 'धावत्याला शक्ती येई आणि रस्ता सापडे' या न्यायाने शालेय शिक्षण विभाग मुलांच्या शिक्षणासाठी निरंतर प्रयत्न करीत आहे. त्या प्रयत्नांनी लाखो विद्यार्थी लॉकडाऊनच्या काळातही शिक्षणाशी जोडले गेले आहेत. ज्या मुलांना तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यात अडचणी आहेत, त्या अडचणींवर मात करण्याकरिता ऑफलाईन शिक्षणासाठी सुद्धा विविध प्रकारे प्रयत्न सुरू आहेत. कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू रहावे यासाठी शालेय शिक्षण विभाग कटिबद्ध आहे.

**प्रश्न : सध्या मुलांच्या शिक्षणासाठी राज्य स्तरावरून काय प्रयत्न सुरू आहेत?**

**उत्तर :** लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर राज्य स्तरावर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्यावतीने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी तात्काळ पावले उचलण्यात आली. 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' या उपक्रमांतर्गत दिक्षा ॲपचा उपयोग करीत, प्रत्येक इयत्तेसाठी रोज एका विषयातील घटक निवडून शिकणे सुरू राहण्यासाठी लिंक देण्यात येत होती. त्याचबरोबर सुट्टीच्या काळात मुलांना आनंद मिळावा या करिता कला, कार्यानुभवाबरोबरच अवांतर वाचनासाठी पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर पुन्हा नव्याने दिक्षा ॲपचा उपयोग करीत विषयनिहाय संबंधित घटक देऊन विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणाचा आरंभ करण्यात आला. या काळात देण्यात आलेल्या रोजच्या अभ्यासमालेचा विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपयोग करीत असल्याचे दिसून येत आहेत. देशात दिक्षा ॲपचा सर्वांत जास्त वापर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी केला आहे. रोज सहा लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी याचा उपयोग करीत आहेत. यू-ट्यूबच्या माध्यमातून इयत्ता पहिली ते बारावीसाठी विषयनिहाय, वर्गनिहाय ई-साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना करिअर निवडीसाठी मदत होईल याकरिता 'महा करिअर पोर्टल' सुरू करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना समुपदेशकांच्या सेवा प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध करून दिल्या आहेत. याचबरोबर केंद्रप्रमुखांना आणि शिक्षकांना कोरोना, स्वच्छता व आरोग्य या विषयावर आधारित अतिशय महत्त्वाचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे, जेणेकरून या संकटाच्या काळात माझा प्रत्येक शिक्षक या परिस्थितीशी समर्थपणे दोन हात करू शकेल.

**प्रश्न : ऑनलाईन शिक्षणाचे प्रयत्न होत असले, तरी ऑफलाईन शिक्षणाबाबत काय प्रयत्न सुरू आहेत?**

**उत्तर :** खरे तर ऑनलाईन, ऑफलाईन शिक्षण असे न म्हणता, शिक्षणासाठी जी जी माध्यमे, स्रोत आपल्या अवतीभोवती दिसत आहेत, त्या सर्व माध्यमांचा उपयोग करीत शिक्षण सुरू राहणे महत्त्वाचे आहे. आज आपल्याला आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे म्हणून त्या प्लॅटफॉर्मचा उपयोग केला जात आहे. यापूर्वी जेव्हा तंत्रज्ञान उपलब्ध नव्हते तेव्हा देखील विविध पर्यायांनी शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न होत होताच; तसाच प्रयत्न ज्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान उपलब्ध होत नाही त्यांच्यासाठी शिक्षण विभाग करीत आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शाळा बंद असल्या तरी १०० टक्के विद्यार्थ्यांच्या घरी पाठ्यपुस्तके पोहोचविण्यात आली आहेत. शैक्षणिक दिनदर्शिकेची निर्मिती करून घरी अभ्यास सुरू असला तरी सर्वांच्या शिकण्यात एकसूत्रता असावी असा प्रयत्न करण्यात आला आहे. JIO TV वर चार माध्यमांतून एकूण १२ शैक्षणिक चॅनल्स सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. JIO सावन रेडिओवरून शैक्षणिक कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. देशातील १,०९,९४२ शाळा ७,६४,३३७ शिक्षक आणि २,२३,५६,०३३ विद्यार्थी यांच्यासाठी गुगल क्लासरूम प्रकल्प कार्यान्वित करीत आहोत. पहिल्या टप्प्यात चाळीस हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात करणार आहोत. शिक्षण विभागाच्या सहकार्याने सुरू असलेला MKCL चा 'टिली मिली' हा दूरदर्शनवरील कार्यक्रम सुद्धा मुलांना शिकण्यात मदत करीत आहे. 'प्रथम' या संस्थेच्या

सहकार्याने 'मिस कॉल द्या, गोष्ट ऐका' हा उपक्रम चालू आहे. तसेच वाड्या, वस्त्या, तांड्यांवर काही स्वयंसेवक, शिक्षण-मित्र विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी स्वयंस्फूर्तीने काम करीत आहेत.

**प्रश्न : याखेरीज आणखी काय प्रयत्न सुरू आहेत?**

**उत्तर :** राज्यात काही शिक्षकांनी या काळाचा उपयोग करीत शिक्षण सुरू ठेवण्याचे जे विविध प्रयत्न केले आहेत ते कौतुकास्पद आहेत. कराडच्या अर्जुन कोळी यांनी टीव्ही च्या स्थानिक चॅनलद्वारे मुलांचे शिक्षण सुरू ठेवले आहे, तर काही शिक्षक मुलांच्या घरोघरी जाऊन कृतिपत्रिकेद्वारे शिकण्यासाठी मदत करीत आहेत. काही सेवानिवृत्त शिक्षक सामाजिक अंतराचे नियम पाळून ग्रामीण भागातील मुलांना शिकते करण्याचा यशस्वी प्रयत्न करीत आहेत. काही शिक्षक विद्यार्थ्यांचे गट करून शिकणे सुरू ठेवीत आहेत. गावातील सुशिक्षित तरुण यामध्ये विविध प्रकारे सहकार्य करीत आहेत. काही गावांत सार्वजनिक ध्वनी व्यवस्थेचा उपयोग करीत शिक्षण सुरू ठेवण्याचा अनोखा प्रकार सुरू केला आहे. मला वाटते, या विविध प्रकारांतून शिक्षण चालू ठेवण्यासाठी सुरू असलेले शिक्षकांचे हे प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत.

**प्रश्न : ऑनलाईन शिक्षणाबद्दल नकारात्मक भूमिका दिसून येत आहे का?**

**उत्तर :** सध्या ऑनलाईन शिक्षण संदर्भाने विविध मतप्रवाह आहेत. त्या संदर्भात ज्या काही भूमिका पुढे येत आहेत, त्या समजून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याकडे सकारात्मकतेने पाहण्याची गरज आहे. आमचा प्रयत्न राज्यातील प्रत्येक मुलाप्रति शिक्षण पोहोचणे हाच आहे. त्यामुळे मुलांचे शिक्षण सुरू रहावे या करिता सर्व पर्यायांची शक्यता पडताळून पाहिली जात आहे. महामारीच्या या परिस्थितीत राज्य सरकार ज्या वेगवेगळ्या माध्यमांतून प्रयत्न करीत आहे, त्यातून मुलांचे शिक्षण सुरू आहे. मुले शिक्षणाशी जोडली जात आहेत. शिक्षक आणि पालकांची भूमिका देखील सकारात्मक आहे. राज्यात सर्वत्र मुलांचे शिक्षण सुरू राहण्याकरिता जे प्रयत्न होत आहेत, त्या सर्वांचे स्वागत करायला हवे असे मला वाटते. मुलांच्या शिक्षणापेक्षा अधिक काही महत्त्वाचे नाही. त्यांच्यापर्यंत, ज्या ज्या माध्यमातून पोहोचणे शक्य आहे त्या दृष्टीने प्रयत्न केले जातील.

# कानेगावातील ऑफलाईन शिक्षण

**सुशीलकुमार पांचाळ**
जि. प. उच्च प्रा. शाळा कानेगाव,
ता. शिरूर आनंतपाळ, जि. लातूर.
भ्रमणध्वनी : ८२०८७८५२९९

सध्या कोरोनाच्या संसर्गाच्या भीतीने सगळ्याच सामाजिक व्यवस्था हादरलेल्या आहेत. पूर्वी कधीही कल्पना केली नाही अशा नव्या वास्तवाला सर्वांनाच सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मुलांच्या सुरक्षिततेच्या चिंतेमुळे शाळा, कॉलेज किंवा कोणत्याही शिक्षण संस्था इतक्यात सुरू करण्याचा धोका पत्करणे योग्य होणार नाही. शाळा पुन्हा पूर्वीच्याच पद्धतीने कधी सुरू होऊ शकतील याचा अंदाज या क्षणी कोणालाच देता येत नाही. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांसमोरचे आव्हान इतरांपेक्षा मोठे आहे. ऑनलाईन पद्धतीचे फायदे-तोटे व त्याच्या मर्यादा यांची एकीकडे चर्चा सुरू असतानाच ऑनलाईन शिक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये येणारे अडथळेही समोर येत आहेत.

*कोरोनाच्या संकटामुळे सर्व व्यवहार ठप्प झाले. उद्योग, बाजार, दुकाने, शिक्षणसंस्था सगळे बंद. शिक्षण विभागाने मार्ग काढला ऑनलाईन शिक्षणाचा. ते सुरूही झाले, पण दुर्गम भागात रेंज नाही, सगळ्यांकडे मोबाईल नाहीत अशा स्थितीत ऑनलाईन शिक्षण अवघड झाले, पण शिक्षकांनी हातपाय गाळले नाहीत. सुशिक्षित पालक, शिक्षित तरूण वर्ग यांच्या मदतीने विद्यार्थ्यांचे लहान गट पाडले. अंतर राखून संपर्क साधला आणि सुरु झाले. 'ऑफलाईन शिक्षण' कानेगावातील या प्रयोगाविषयी...*

लातूर जिल्ह्यात साधारणपणे १७ मार्चपासून शाळांना सुट्ट्या देण्यात आल्या. पहिला लॉकडाऊन सुरू झाला तेव्हा अनेक प्रश्न मनात येत होते. मुलांना शिक्षणाच्या प्रक्रियेत सक्रियपणे सामील करून घेण्यासाठी काय काय प्रयत्न करावे लागतील? ऑनलाईन पद्धतीसाठी पालकांचे सहकार्य मिळेल का? नेहमी शाळेत शिकविताना शिक्षक व विद्यार्थी समोरासमोर असतात, पण आता मात्र सगळे विद्यार्थी समोर दिसतीलच असे नाही. मग आता अभ्यासक्रमातील मुद्दे मुलांपर्यंत पोहोचविण्यासाठी कोणती काळजी घ्यावी लागेल? मुलांनी या प्रक्रियेत मनापासून सहभागी होण्यासाठी काय करावे लागेल? असे अनेक प्रश्न भेडसावत होते. शाळेत २०१८ पासून कार्यरत असलेल्या 'कानेगाव शिक्षक-पालक' या व्हॉट्सॲप ग्रुपचे 'कानेगाव लर्न फ्रॉम होम' असे नामांतर करून या ग्रुपच्या माध्यमातून शैक्षणिक व्हिडिओ, कंटेंट, पीडीएफ पाठवून अभ्यासाला सुरुवात केली. जवळपास दीड महिना झूम मीटिंगद्वारे अध्यापनही केले, पण या ऑनलाईन शिक्षणाला शाळेतील २० ते ३० टक्केच विद्यार्थी प्रतिसाद देत होते. बाकीच्या विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन नव्हते. त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, त्यांनीही इतरांप्रमाणे शिक्षणाच्या प्रवाहात असणे महत्त्वाचे आहे हा विचार स्वस्थ बसू देत नव्हता. त्यातच दुसरा लॉकडाऊन संपल्यानंतर मे महिन्याच्या मध्यात

बाहेरगावाहून आलेल्या नागरिकांना आमच्या शाळेतच संस्थात्मक विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले होते. तिथे आमची सर्वांची दिवसरात्र ड्यूटी लागली. पहिल्यांदा जेव्हा कानेगाव येथे गेलो तेव्हा शाळेतील मुले आमच्याकडे कुतूहलाने पाहत होती. काहींनी समोर येऊन आपलेपणाने चौकशी केली. अभ्यासू विद्यार्थ्यांनी ऑनलाईन दिलेला अभ्यास कधी तपासता, असा प्रश्नही केला. सर्वांना सामोरे जात शाळेत गेलो. त्या वेळी काही पालक सोबत आले होते. त्यांच्या सर्वांच्या डोळ्यांत चिंता जाणवत होती. त्यांच्याशी चर्चा केली. या काळात कोरोनाशी दोन हात करताना कोणती काळजी घ्यावी, कोणती सतर्कता बाळगावी यांविषयी मार्गदर्शन करून त्यांचे समुपदेशनही केले. मग निर्णय घेतला की, आता ऑनलाईन शिक्षणासोबत ऑफलाईन शिक्षण सुरू ठेवायचे. काही पालक, शिक्षक मित्र आणि वरच्या वर्गातील मुले विद्यार्थी मित्र म्हणून काम करण्यास तयार झाले. व्हॉट्सॲप ग्रुप व झूम मीटिंगद्वारे दिलेला अभ्यास ज्यांच्याकडे स्मार्ट फोन नाहीत अशा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, त्यांच्या अडचणी सोडवून त्यांना मार्गदर्शन करणे अशी त्यांची भूमिका होती. यामध्ये विकास चिलकुरे, अनंत येडले, भास्कर लांडगे, विकास लांडगे, विवेकानंद येडले हे शिक्षणप्रेमी पालक जबाबदारी घेऊन शिक्षक मित्र म्हणून भूमिका पार पाडत आहेत. ते विद्यार्थ्यांना Covid-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात, स्वतःची कशी काळजी घ्यावी यांविषयीही मार्गदर्शन करीत आहेत.

**वरच्या वर्गातील मुलेच बनली विद्यार्थी मित्र :** समुपदेशन करताना पालकांना अभ्यासगटाची संकल्पना सांगितली. त्यातून SELF - Students Education Learning Force अर्थात 'विद्यार्थी मित्र.' जे आपल्यासह व शेजारील मित्रांसोबत सहअध्ययनात मदत करतील अशा आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची 'विद्यार्थी मित्र' म्हणून निवड करण्यात आली. हे विद्यार्थी मित्र स्वयंप्रेरणेने शिक्षक मित्रांच्या मार्गदर्शनाखाली आठ ते दहा विद्यार्थ्यांच्या अभ्यासगटात सुरक्षिततेची काळजी घेऊन त्यांचा अभ्यास घेऊ लागले. मुले एकमेकांच्या सहकार्याने शिकू लागली, चर्चा करू लागली, उपक्रमांत सहभागी होऊ लागली. काहींनी Covid-19 वर चित्रे काढली, काहींनी कविता केल्या तर काहींनी निबंध लिहिले, काही मुलांनी तोरण तयार करणे, आकर्षक भेटवस्तू बनविणे अशा कला जोपासल्या. यात काही मुले विद्यार्थी मित्र म्हणून समर्थपणे साथ देत आहेत. आता हीच मुले कोरोना कॅप्टन म्हणून काम पाहत आहेत. यासाठी एकूण आठ अभ्यासगट तयार केले आहेत. या अभ्यासगटांत सर्व मुले एकात्मिक शिक्षण पद्धतीने शिकत आहेत. स्वयंप्रेरणेने काम करणारे हे कोरोना कॅप्टन सर्व इयत्तांतील विद्यार्थ्यांचा दररोज एक विषय यानुसार सहअध्ययन पद्धतीने, गटात चर्चा करून, कृती करून घेऊन शिक्षक मित्रांच्या व मार्गदर्शक शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास घेत आहेत. पूर्व प्राथमिक वर्गातील मुलांचे वाचन-लेखन, संख्यांवरील क्रिया, उजळणी यांचा सराव घेत आहेत, तर उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांकडून प्रकट वाचन, स्वयंलेखन, संवाद, चर्चा असेही उपक्रम घेण्यात येत आहेत. सह्याद्री चॅनलवरील 'टिली मिली' कार्यक्रम पाहण्यासाठी सनियंत्रण करीत आहेत.

**शिक्षक आपल्या दारी :** या काळात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे तर्फे 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' ही अभ्यासमाला १३ एप्रिलपासून नियमितपणे चालू झाली. याची पोस्ट पालकांच्या ग्रुपवर दररोज दिली जात आहे. तो अभ्यास मुले आपल्या घरी पालकांच्या व विद्यार्थी मित्रांच्या मदतीने करीत आहेत. लॉकडाऊनच्या काळात जेव्हा जेव्हा आम्ही शाळेत गेलो तेव्हा शिक्षक मित्र व विद्यार्थी मित्र यांना दिक्षा ॲप कसे वापरावे याविषयी मार्गदर्शन केले. क्यू आर कोड सर्च करून अभ्यास कसा करायचा याचीही माहिती सांगितली. अभ्यासमालेतील उपक्रम, तयारी स्पर्धा परीक्षेची यांचीही माहिती देण्यात आली.

(पृष्ठ क्र. १९ वर)

# ऑफलाईन आणि ऑनलाईन शिक्षणाचा सुरेख मेळ...

**संजय जगताप**
केंद्रीय प्राथ. शाळा माण, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी : ९४२१०५३१५५

*लॉकडाऊनमुळे शाळा बंद असल्या तरी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी वेगवेगळे मार्ग अनुसरले जात आहेत. ऑनलाईन शिक्षण सुरू केले, पण त्यातही काही अडचणी आल्या. अशा वेळी जमेल तेथे ऑनलाईन आणि जमेल तेथे ऑफलाईन असा शिक्षणाचा सुरेख मेळ घालत शिक्षण प्रवाह वाहता ठेवणाऱ्या माण येथील शाळेच्या उपक्रमाविषयी.....*

**केंद्रीय प्राथमिक शाळा माण यांचा उपक्रम :**

Covid-19 मुळे आपल्या शाळा १४ मार्च पासून बंद आहेत. तेव्हापासून विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी हा शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून आम्ही केंद्रीय प्राथमिक शाळा, माण या शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना या शिक्षण प्रवाहात ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत. तसे पाहिले तर कोल्हापूर जिल्ह्यातील आमचा शाहूवाडी तालुका डोंगराळ आणि दुर्गम भागात आहे. आज देखील शाहूवाडी तालुक्यामधील जवळपास साठ टक्के भागामध्ये मोबाईल रेंज पोहोचलेली नाही; शिवाय बऱ्याचशा मुलांच्या पालकांकडे अँड्रॉईड मोबाईल नाहीत. आमच्या शाळेतही यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही.

आमच्या शाळेचा गेल्या वर्षी एकूण पट १३६ होता. आम्ही आमच्या शाळेत राबवीत असलेल्या विविध उपक्रमांमुळे त्यामध्ये वाढ होऊन या वर्षी शाळेचा पट १५६ झाला आहे. या १५६ विद्यार्थ्यांपैकी जवळपास ६५ विद्यार्थ्यांजवळ अँड्रॉइड मोबाईल आहेत. या विद्यार्थ्यांचा आम्ही व्हॉट्सॲप ग्रुप तयार केला आहे. या ग्रुपवर आम्ही दिक्षा ॲपवरील अभ्यासक्रम तसेच इतर शिक्षकांनी तयार केलेला अभ्यास देत असतो. वेगवेगळ्या पीडीएफ फाईल्स पाठवीत असतो.

मी माझ्या घरीच एक वर्गखोली तयार केली आहे. आपल्या समोर विद्यार्थी आहेत असे समजून जसे आपण शाळेत अध्यापन करतो त्याच पद्धतीने मी अध्यापन करतो. त्याचे व्हिडिओ बनवून ते यू-ट्यूबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठवीत आहे. तसेच झूम ॲपचा वापर करून दररोज संध्याकाळी सहा ते साडे सात या वेळेत प्रत्यक्ष झूम मीटिंगद्वारे विद्यार्थ्यांना अध्यापन करीत आहे. यासाठी प्रथम विद्यार्थ्यांना झूम ॲप कसे वापरायचे हे शिकविले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा देखील अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. विद्यार्थी अगदी आतुरतेने संध्याकाळी सहा वाजण्याची वाट पाहत असतात. एखाद्या वेळी जर मीटिंगला उशीर झाला तर विद्यार्थी फोन करून 'सर, अजून मीटिंग का सुरू झाली नाही' असे विचारतात. आम्ही संध्याकाळी सहा ते साडेसात ही वेळ मुद्दाम निवडली आहे याचे कारण म्हणजे संध्याकाळी पालक घरी असतात आणि त्या वेळी विद्यार्थ्यांना पालकांचा मोबाईल

मिळू शकतो. विद्यार्थ्यांना व्हॉट्सअॅप ग्रुपवर अभ्यास दिला जातो. आमच्या शाळेतील अध्यापक दररोज तो अभ्यास तपासतात व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. त्याचबरोबर आम्ही आमच्या विद्यार्थ्यांबरोबरच इतर विद्यार्थ्यांचाही अभ्यास झाला पाहिजे हा हेतू डोळ्यांसमोर ठेवून 'शाहूवाडी तालुका शैक्षणिक व्यासपीठ' या शिक्षकांनी स्थापन केलेल्या संस्थेद्वारे आम्ही इयत्तानिहाय व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केले आहेत. या व्हॉट्सअॅप ग्रुपवर स्वयंस्फूर्तीने अभ्यास देण्यासाठी व अभ्यास तपासण्यासाठी पाच शिक्षकांची निवड केली आहे. इयत्ता पहिली ते आठवी असे आठ ग्रुप तयार करून दररोज सकाळी या विद्यार्थ्यांना अभ्यास दिला जातो. दिवसभर हा ग्रुप बंद असतो. संध्याकाळी ग्रुप पुन्हा चालू केला जातो आणि विद्यार्थ्यांनी व्हॉट्सअॅप वर पाठविलेला अभ्यास संबंधित शिक्षक तपासतात. गेले दोन महिने आमचा उपक्रम सुरू आहे. या उपक्रमाला पालकांचा देखील अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे.

आमच्या शाळेमध्ये जवळच असलेल्या माण धनगरवाडा, पातवडे, ठाणेवाडी, मूटकलवाडी, परळे या गावातून देखील विद्यार्थी येतात. या गावांपैकी ठाणेवाडी, माण धनगरवाडा, पातवडे या गावांमध्ये मोबाईल रेंज खूपच कमी आहे, अगदी नाहीच म्हटले तरी चालेल. त्यामुळे या ठिकाणी ऑनलाईन अभ्यास पाठविता येत नाही किंवा त्या विद्यार्थ्यांना झूम मीटिंगमध्ये देखील समाविष्ट करून घेता येत नाही. त्यामुळे मी व माझे सहकारी या गावांमध्ये जाऊन सोशल डिस्टन्सिंग पाळून तसेच योग्य ती सर्व खबरदारी घेऊन, गट पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांना अभ्यास देत आहोत व परत एक-दोन दिवसांनी जाऊन विद्यार्थ्यांनी केलेला अभ्यास तपासत आहोत. विद्यार्थी सुद्धा अगदी मनापासून अभ्यास करीत आहेत. आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी या Covid-19 च्या काळात शिक्षणापासून दूर राहू नयेत यासाठी आणि त्यांना शक्य तितके अभ्यासात गुंतवून ठेवण्यासाठी जिथे रेंज आहे आणि ज्या पालकांकडे अँड्रॉईड मोबाईल आहेत त्या ठिकाणी ऑनलाईन अध्यापन आणि ज्या ठिकाणी रेंज नाही व पालकांकडे मोबाईल नाही अशा ठिकाणी प्रत्यक्ष गट पद्धतीचा वापर करून आम्ही अध्यापन करीत आहोत. गावातील नववी, दहावी व कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील यामध्ये सहभागी करून घेतले आहे. या मोठ्या मुलांना आम्ही त्यांच्या व्हॉट्सअॅपवर अभ्यास पाठवितो आणि तो अभ्यास मुलांकडून करून घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करतो. या उपक्रमात सर्व शिक्षक सहभागी आहेत. आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये म्हणून शक्य तितके प्रयत्न आम्ही सगळे मिळून करीत आहोत.

■■■


## वर्गणीदारांसाठी सूचना

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे. आपली वर्गणी **'संपादक, जीवन शिक्षण, पुणे ३०'** या नावे **'स्टेट बँक ऑफ इंडिया'**च्या कोणत्याही शाखेत बचत खाते क्र. **11153675105** मध्ये भरावी. बँकेत पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, स्वत:चा पूर्ण पत्ता, (पिनकोड द्यावा.) मोबाईल नंबर व ई-मेल आयडीसह पोस्टाने अथवा ई-मेलने jeevanshikshan@maa.ac.in वर पाठवावी. 'जीवन शिक्षण'ची वार्षिक वर्गणी अथवा पुस्तके मागणीसाठीचे पैसे मनीऑर्डरनेही स्वीकारले जातील.

# शाळेचे प्रयत्न व समाजाची साथ

**प्रमोद बोरकर**
जि. प. उच्च प्राथ. शाळा सास्ती, पं.स. हिंगणघाट, जि. वर्धा.
भ्रमणध्वनी : ९६७३१६४८४१

कोरोनामुळे सर्व जनजीवनच विस्कळीत झाले आहे. सर्व व्यवहार ठप्प झाले आहेत. कोरोनामुळे सर्वत्र अगदी दहशतीचे वातावरण आहे. आता काय होणार हे कोणीही सांगू शकत नाही. या बंद मधून शाळाही सुटल्या नाहीत. कोरोनाने माणसांना माणसांपासून तर विद्यार्थ्यांना शाळेपासून दूर नेले आहे. शाळाच बंद असल्यामुळे सर्वांच्या मनात शिक्षणाविषयी अनिश्चितता निर्माण झाली आहे. शिक्षक, पालक व विद्यार्थी संभ्रमात पडले आहेत. सर्वांच्याच मनात शिक्षण कसे होणार असा प्रश्न आहे. या परिस्थितीत आपण शिक्षक म्हणून काय करायला पाहिजे? विद्यार्थ्यांचे शिक्षण बंदच ठेवायचे का? ते शिक्षणाच्या प्रवाहात कसे राहतील? असे अनेक प्रश्न माझ्या मनात आले आणि आपले विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात राहिलेच पाहिजेत असा मनाशी ठाम निश्चय करून मी नियोजनाला प्रारंभ केला.

> *शाळा बंद, विद्यार्थी घरी आणि शाळा सुरू होण्याबाबतीतील अनिश्चितता; यामुळे शिक्षक, पालक यांच्यात संभ्रम निर्माण झाला आहे, अशा स्थितीत व्हॉट्सअॅप, फोन, प्रत्यक्ष संपर्क, पालकांशी संपर्क अशा विविध प्रकारांनी मुलांचे शिक्षण चालू ठेवण्यासाठी होत असलेले प्रयत्न आणि मुलांनी दिलेला उत्तम प्रतिसाद व पालक, ग्रामस्थ यांचा सकारात्मक दृष्टिकोन यांमुळे सास्ती येथील शाळेत सुरू असलेल्या शिक्षणाविषयी....*

शासनानेही मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी Learn from home आणि शिक्षकांसाठी Work from home चा पर्याय दिला. विविध स्तरांवर E-content निर्मितीची सुरुवात झालेली असताना, आमच्या विद्यार्थ्यांसाठी मी आणि माझ्या सहकारी शिक्षकांनी नियोजन करून इयत्तानिहाय व्हॉट्सअॅप समूह तयार केले. माझ्या वर्गाच्या सर्व विषयांच्या अभ्यासासह इतर सर्व वर्गांसाठी मी इंग्रजी विषयावर लक्ष केंद्रित केले. तेव्हा शाळेतील एकूण विद्यार्थ्यांपैकी केवळ १४ विद्यार्थ्यांच्या पालकांकडे अँड्रॉईड मोबाईल असल्याचे लक्षात आले.

विद्यार्थ्यांचे पालक शेतावर कामासाठी जात असल्यामुळे विद्यार्थ्यांना दिलेला अभ्यास पूर्ण करण्यात अडचणी येत होत्या. काही पालकांकडे इंटरनेटची सुविधा नव्हती म्हणून मी विषयवार दैनंदिन अभ्यासाचे वेळापत्रक पालकांना दिले. त्याचबरोबर माझ्या वर्गाला दररोजचा अभ्यास व सातही वर्गांना इंग्रजीचा अभ्यास व्हॉट्स अॅपवर देऊन तो विद्यार्थ्यांकडून करून घेण्याबद्दल पालकांना फोनवरून सूचना देण्यास सुरुवात केली. सर्व विद्यार्थ्यांकडे मोबाईल नव्हते; त्यामुळे येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी पालकांच्या भेटी घेण्याचे ठरविले.

मी दर दोन दिवसांनी एकदा सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळून पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन संवाद साधला. मोबाईलवर दिलेला अभ्यास


अपने घर मे सॅनिटायझर लाओ । कोरोना को दूर भगाओ ।

समजावून देऊन विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यास सुरुवात केली. काही मुलांना वर्कशीटवर अभ्यास देणे सुरू केले. ज्या पालकांकडे जिओ फोन असल्याचे लक्षात आले, त्यांच्या फोनवर व्हॉट्सॲप सुरू करून दिले तर काही मुलांना तुमच्याकडे फोन आहे तर तुम्ही एकमेकांना दाखवा असे सांगितले. पालकांनाही घराजवळील इतर विद्यार्थ्यांना मदत करण्यास प्रोत्साहित केले. काही ठिकाणी फोन असलेल्या शेजाऱ्यांची मदत घेण्यास सांगितले. गावातील तरुण मंडळींना भेटून मुलांना अभ्यासात मदत करण्याविषयी सांगून त्यासाठी प्रयत्न सुरू केले.

यामुळे शाळा बंद असतानाही आपली मुले शिक्षण घेऊ शकतात, हा विश्वास पालकांमध्ये निर्माण होऊन पालकांचे सहकार्य मिळण्यास सुरुवात झाली. दरम्यान मी सहावी व सातवीतील अकरा मुलांचे Leap For Word करिता रजिस्ट्रेशन करून घेतले. मुलांना दररोज एक व्हिडिओ पाहण्यास देणे, दुसऱ्या दिवशी त्यावर वर्कशीट देऊन सराव करून घेणे, वर्कशीट तपासून देणे व तिसऱ्या दिवशी त्यावर आधारित सोपी टेस्ट घेणे असे सुरू केले. दरम्यान जिल्ह्याच्या टीममध्ये E-content व गुगल फॉर्म द्वारे टेस्ट निर्मिती करण्याच्या टीममध्ये काम करण्याची संधी मला मिळाली आणि मीही माझ्या शाळेतील मुलांसाठी E-content व गुगल फॉर्म द्वारा निर्मित सर्व विषयांवरील टेस्ट सर्व इयत्तांना देणे सुरू केले. यात चुका लवकर लक्षात येत असल्यामुळे आणि यातील व्हिडिओ मनोरंजक असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासात आनंद वाटायला लागला. विद्यार्थी व पालकही फोन करून अभ्यासातील अडचणी सांगू लागले व नवीन अभ्यासाची मागणी स्वतःहून करायला लागले. शाळा बंद असतानाही गावात शैक्षणिक वातावरण निर्माण होण्यास सुरुवात झालेली होती. लॉकडाऊन असल्यामुळे मला यासाठी गावातील पदाधिकारी, सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांचीही मदत मिळायला लागली. त्यांनीही मोबाईल नसलेल्या विद्यार्थ्यांना इतरांचे सहकार्य मिळवून देण्यास मदत करणे सुरू केले. हळूहळू एप्रिलच्या मध्यापर्यंत पहिली ते सातवीमधील बत्तीस विद्यार्थी मोबाईलच्या माध्यमातून अभ्यासात सहभागी झाले होते. याकरिता मी माझ्या शाळेत गेल्या दोन वर्षांपासून राबवीत असलेल्या My English Learning Tree या उपक्रमाचा लाभ मला इंग्रजी विषयासाठी झाला. याच वेळेत आम्ही शाळा स्तरावर वर्ग सातवीसाठी Google Classroom च्या माध्यमातूनही शिक्षण देणे सुरू केलेले होते. त्यामुळे ही मुले अभ्यासात रमायला लागली. मुलांनीही दररोज केलेला अभ्यास व्हॉट्सॲप वर पाठविणे सुरू केले. अशा प्रकारे पालकांच्या विश्वासासह जूनच्या मध्यापर्यंत ऑनलाईन व ऑफलाईन द्वारे विद्यार्थ्यांना अभ्यास देणे सुरू असताना ४९ पैकी ४८ विद्यार्थी प्रत्यक्ष अभ्यासात सहभागी झाले होते.

दि. १५ जूनच्या शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व शाळा व्यवस्थापन समितीच्या निर्णयानुसार एक जुलैपासून शाळा सुरू करण्याची कार्यवाही सुरू झाली. नवीन सत्र व प्रत्यक्ष शाळा सुरू होणार नाही म्हणून सुरुवातीला पूर्वतयारी व एक जुलैपासून इयत्ता तिसरी ते सातवी ऑनलाईन अभ्यास व पहिली ते दुसरी ऑफलाईन वर्ग घेण्याचे निश्चित करून इयत्ता सहावी व सातवीसाठी, विषय मराठी सोमवार व गुरुवार, विषय इंग्रजी मंगळवार व शुक्रवार, विषय हिंदी बुधवार व शनिवार सकाळी ८ ते ९, दुपारी ३ ते ४ व सायंकाळी ७.३० ते ८.३० याप्रमाणेच इतर वर्गांचेही वेळापत्रक तयार करून घेतले. विद्यार्थी व पालकांनाही वेळापत्रकाची माहिती दिली. त्याप्रमाणे शाळेतील इतर शिक्षकांनीही वर्गवार व विषयनिहाय वेळापत्रक विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देऊन त्याप्रमाणे एक जुलैपासून प्रत्यक्ष शासनाच्या शैक्षणिक दिनदर्शिकेप्रमाणे शिक्षणाला सुरुवात केली. पहिली व दुसरीतील विद्यार्थ्यांना आठवड्याच्या

अभ्यासाची वर्कशीट तयार करून दर सोमवारी पालकांपर्यंत पोहोचवून अभ्यास समजावून देणे सुरू केले. सोबतच काही E-content पालकांना मोबाईलवर देणे सुरू आहे. वर्ग तिसरी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना व्हॉट्सॲपवर दररोज दिलेला अभ्यास विद्यार्थी समजून घेऊन, सोडवून पाठवीत आहेत. सायंकाळी सात ते आठ या वेळात Google meet, Zoom app व्हिडिओ कॉल, व फोनद्वारे चर्चा करून विद्यार्थ्यांना अभ्यासात येणाऱ्या अडचणी सोडवीत आहोत. सोबतच चौथी, पाचवी, सहावी, सातवी या वर्गांना Google Classroom चा वापर करून अभ्यास देणे सुरू आहे.

इयत्ता चौथी, पाचवी, सहावी, सातवी या वर्गांना देण्यात येत असलेला आठवड्यातील अभ्यास समजला किंवा नाही हे तपासण्याकरिता दर रविवारी Google Form वर Test तयार करून मुलांकडून सोडवून घेतो. यात ६० टक्के गुण मिळाल्यास आठवड्यातील अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना नावासहित मेलद्वारे प्राप्त होते. यापेक्षा कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेटून, Google meet किंवा फोनद्वारे मार्गदर्शन करून त्यांच्याकडून पुन्हा टेस्ट सोडवून घेतो. यामुळे मुलेही अतिशय आनंदाने अभ्यासात रमत आहेत. सोबतच २० जुलैपासून सुरू झालेला सह्याद्री चॅनलवरील 'टिली मिली' हा कार्यक्रम विद्यार्थी पालकांसह बघत असून कार्यक्रम संपल्याबरोबर विद्यार्थ्यांसोबत चर्चा करून व्हॉट्सॲप वर कार्यक्रमातील भागावर अभ्यास देत आहोत.

या सत्रातील ५३ पैकी ५० विद्यार्थी शाळा बंद असतानाही शिक्षण घेत असून भाविक सचिन सातपुते इयत्ता सहावी हा विद्यार्थी ७० टक्के अस्थिव्यंग असतानाही आपल्या पहिलीतील बहिणीसोबत आनंदाने अभ्यासात सहभागी होत आहे. अभ्यासाकरिता विद्यार्थी Android mobile वर Diksha app, YouTube, Phet simulation, Google Earth, Geogebra, Bolo, Duolingo, Pradigi kids, Google meet, Google classroom यांसारख्या Apps , Bcpt videos, Digital sakshar यू-ट्यूब चॅनल, Google web siets च्या माध्यमांतून माहिती मिळवून अभ्यास करीत आहेत.

आम्ही प्रत्येक मुलाच्या घरी जाऊन, पालकांच्या भेटी घेऊन अभ्यासाबद्दल पालकांना जागृत करीत असल्यामुळे हे सर्व शक्य झाले आहे. हे करीत असल्यामुळे विद्यार्थ्यांवर होणारा सकारात्मक परिणाम बघून गावातील पदाधिकारी सरपंच, शिक्षण समिती अध्यक्ष, इतर सदस्य व पालकांना मुले यातूनही शिकू शकतात हे समजायला लागले. त्यामुळे पालकांचे समाधान झालेले असून शिक्षणाविषयी, शिक्षकांविषयी व शाळेविषयी त्यांच्या मनात विश्वास निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये पालकांचा सहभाग वाढलेला दिसून येत आहे.

शाळा आणि शिक्षक करीत असलेले प्रयत्न पाहून, शाळा बंद असूनही आपल्या मुलांचे शिक्षण सुरू झालेले पाहून ज्या पालकांकडे अँड्रॉइड फोन नव्हते त्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी अँड्रॉइड फोन विकत घेतले. डीडी सह्याद्रीवरील 'टिली मिली' हा कार्यक्रम बघण्यासाठी काही पालकांनी नवीन टीव्ही सुद्धा घेतले आहेत. पालक आपणहून मुलांच्या अभ्यासासाठी फोन करायला लागले आहेत. शेजारी राहणाऱ्या मुलांना अभ्यासात मदत करायला लागले आहेत. शिक्षकांसोबतच गावातील तरुण मंडळींचा सहभाग अभ्यासात मिळायला लागला आहे.

संपूर्ण गावातील विद्यार्थी, पालक, पदाधिकारी, युवक वर्ग यांच्यात शिक्षणाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून मोबाईलचा वापर शिक्षणासाठी चांगल्या प्रकारे होऊ शकतो असा विश्वास निर्माण झालेला आहे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की शाळेचे प्रयत्न व समाजाची साथ याचेच हे यश!

# सावध तो सुखी

**अरुण जाधव (अधिव्याख्याता)**
सीपीडी विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
भ्रमणध्वनी : ९४२३५३७९२७

कोरोना–कोविड–१९ (COVID-१९) या विषाणू–मुळे होणाऱ्या आजाराने सर्व जग त्रस्त झाले आहे. भारतात मार्चच्या दुसऱ्या पंधरवड्यापासून या आजारामुळे भीतिदायक वातावरण निर्माण झाले. सर्वच व्यवहार बंद पडले, त्यातून शाळा आणि शिक्षणही सुटले नाही. कोरोनाबाबतची उपलब्ध माहिती आधीच अर्धी अधुरी, त्यात समाज माध्यमे आणि प्रसार माध्यमांतून दिल्या जाणाऱ्या भयावह बातम्या यांमुळे सर्वांच्याच पोटात भीतीचा गोळा निर्माण झाला. दिवसांमागून दिवस गेले, कोरोनाचे रुग्ण काही कमी होईनात. त्यामुळे मानसिक तणावही वाढू लागला. लोकांना कोरोनाबाबत योग्य माहिती मिळाली, या काळात कोणती काळजी घ्यायची हे कळले तर मग भीती कमी होईल हे लक्षात आले. शिक्षण विभागाच्या दृष्टीने याबाबतची योग्य माहिती पोहोचविण्यासाठी शिक्षकांशिवाय दुसरा कोणता चांगला दुवा असू शकतो? शिक्षकांचा विद्यार्थ्यांवर, पालकांवर व समाजावर जेवढा प्रभाव असतो तेवढा अन्य कुणाचाच नसतो. त्यामुळे या शिक्षकांनाच जर योग्य माहिती मिळाली, तर सर्वप्रथम त्यांच्या मनातील भीती दूर होईल व त्यांच्यामार्फत इतरांचीही दूर होईल हे लक्षात घेतले गेले. त्यातूनच शिक्षकांना कोविड–१९ बाबतचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्याचा विचार समोर आला.

> *कोरोना बाधितांची वाढती संख्या समोर येऊ लागल्यावर या आजाराची स्पष्टशी कल्पना नसल्याने उलटसुलट माहिती दिली जाऊ लागली. प्रसार माध्यमांवरील बातम्यांनी लोक घाबरून गेले. सतत भीतीच्या छायेत वावरताना मनावरचा ताण वाढणारच. अशा स्थितीत लोकांना नेमक्या मार्गदर्शनाची, प्रतिबंधात्मक उपायांच्या माहितीची गरज आहे हे लक्षात आले. शिक्षकांना हे माहीत झाले तर ते समाजात सर्वांपर्यंत पोहोचेल या विश्वासाने KPALP प्रशिक्षणात या विषयावर माहिती दिली गेली. त्याविषयी...*

केंद्र प्रमुख ॲकॅडमिक लीडरशीप प्रोग्रॅम (KPALP) या उपक्रमाच्या प्रशिक्षणाच्या शेवटच्या टप्प्यात राज्यातील तीन हजार केंद्र प्रमुखांना कोरोनाबाबत जसे प्रशिक्षण देण्यात आले, त्याच पद्धतीने राज्यातील शिक्षकांनाही प्रशिक्षण देण्यात यावे असा विचार युनिसेफच्या वॉश (Water, Sanitation and Hygiene - WASH) व शिक्षण विभागाने, मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे (SCERT) डॉ. दिनकर पाटील यांच्यासमोर मांडला. त्यांनी त्यास तात्काळ मान्यता दिली आणि राज्यातील सर्वच जिल्ह्यांतील शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आखला गेला. 'Covid-19:WASH in School and Learning from Home Package' हे प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले. दिनांक २५ जून ते २१ जुलै या काळात राज्यातील सर्वच जिल्ह्यांतील एकूण ४३,८१० शिक्षकांना दर्जेदार प्रशिक्षण देण्यात आले. बृहन्मुंबई कॉर्पोरेशनच्या चौदा हजार शिक्षकांनाही स्वतंत्रपणे प्रशिक्षण देण्यात आले.

एकूण ५७,८१० शिक्षकांत शहरी व ग्रामीण भागातील खाजगी शाळांचे शिक्षकही सहभागी झाले

होते. अनेकांनी आपल्या कुटुंबीयांसह, शेजाऱ्यांसह प्रशिक्षण घेतले. प्रत्येक शाळेतून किमान एक शिक्षक सहभागी व्हावेत असे नियोजन करण्यात आले होते. ऑनलाईन प्रशिक्षणाच्या मर्यादा असतानाही उपस्थित प्रशिक्षणार्थींचा प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक होता. 'अशा प्रकारची प्रशिक्षणे वारंवार घेण्यात यावीत' अशी मागणी जवळजवळ प्रत्येक प्रशिक्षण वर्गातून होत होती त्यामुळे शिक्षकांवर या प्रशिक्षणाचा प्रभाव पडून त्यांची कोरोनाबाबतची भीती कमी करण्यात नक्कीच यश मिळाले असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

या प्रशिक्षणात लर्निंग फ्रॉम होम पॅकेजचे एक सत्र तर कोरोनाबाबतची सहा सत्रे होती. प्रश्नोत्तरे धरून दोन ते अडीच तास चालणाऱ्या या प्रशिक्षणात पुढीलप्रमाणे विषय समाविष्ट होते. लर्निंग फ्रॉम होम पॅकेज, उपलब्ध संसाधनांचा आढावा, लर्निंग फ्रॉम होमचे तपशील, लर्निंग फ्रॉम होम पॅकेज प्रसारणाची माध्यमे, व्हायरस वीर श्रेयस, बुकीबू, दिक्षा ॲप, जीओ टीव्ही, गली गली सिम सिम, मिस्ड कॉल दो–कहानी सुनो, करीअर पोर्टल, संवाद साखळी या विषयांवर 'लर्निंग फ्रॉम होम पॅकेज' या सत्रातून मी व युनिसेफच्या राज्य सल्लागार (शिक्षण) मैथिली गुप्ते यांनी मार्गदर्शन केले. कोरोना काय आहे, कोविड–१९ काय आहे, त्याचा प्रसार कसा होतो, तो कसा रोखता येतो, हात धुण्याचे SUMAN-M (सुमन–एम) हे तंत्र काय आहे, मास्कची हाताळणी कशी करायची, अधिक जोखमीचे गट कोणते, प्रतिबंधात्मक उपायांसाठी कुटुंब व सार्वजनिक स्तरावर कशी स्वच्छता ठेवावी, पिण्याच्या पाण्याची हाताळणी कशी करायची, शौचालयाचा वापर कसा करायचा, कोरोनानंतरची आपली शाळा कशी असेल, त्या वेळी कोणती काळजी घ्यायची, कोणावर काय जबाबदारी असणार आहे, विद्यार्थी व पालक यांच्या मनातील भीती कशी दूर करायची, शाळा सुरू करण्याबाबतचे शासनाचे निर्देश काय आहेत, स्वच्छ भारत–स्वच्छ विद्यालय अभियान, मुलांसाठी हात धुण्याची पॅडेल ऑपरेटेड, एल्बो ऑपरेटेड सुविधा किंवा अन्य सुविधा कशा निर्माण कराव्या, मुलांशी संवाद साधण्यासाठी उपलब्ध माहिती शिक्षण व संवाद साहित्य (IEC Material), कोविड संभाव्य व बाधित व्यक्तीची काळजी, मानहानी व भेदभाव, गैरसमज व संवाद उपक्रम अशा विविध विषयांवर कोविड संदर्भातील सहा सत्रांत अत्यंत सखोल अशी माहिती देण्यात आली. युनिसेफचे राज्य सल्लागार संदीप तेंडोलकर, अपर्णा कुलकर्णी–गोवंडे, जयंत देशपांडे, बालाजी वरकट यांनी ही सत्रे घेतली. युनिसेफच्या वतीने एज्युकेशन स्पेशालिस्ट रेश्मा अग्रवाल, वॉश स्पेशालिस्ट युसूफ कबीर, वॉश ऑफिसर आनंद घोडके यांनीही प्रशिक्षणाच्या दरम्यान उपस्थित राहून प्रोत्साहन दिले.

प्रशिक्षणाची सुरुवात मा. संचालक डॉ. दिनकर पाटील यांच्या मार्गदर्शनाने झाली. त्यानंतर प्रशिक्षणाची धुरा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या आयटी सेलचे उपसंचालक विकास गरड यांनी सांभाळली. महेश चोथे, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी प्रशिक्षण समन्वयक म्हूणन मोलाची भूमिका पार पाडली. कोरोनाबाबत लोकांच्या मनात असलेली भीती दूर करतानाच कोणती काळजी घ्यावी याचेही मार्गदर्शन या प्रशिक्षणात करण्यात आले.

कोरोनाच्या काळात जो सावध राहील तो सुखी राहील हे सांगण्यासाठी 'सावध तो सुखी' हा मंत्र देण्यात आला. तो सर्वांनाच भावला. कोणी तरी सुविधा देईल व नंतर आपण वापरू असा विचार करून आपण बसलो, तर आपण आपलेच आरोग्य धोक्यात आणू. आपल्या आरोग्यासाठी आपल्यालाच पावलं उचलायला हवीत असाही संदेश या वेळी देण्यात आला. प्रशिक्षणाबाबत अनेक प्रशिक्षणार्थींच्या प्रतिक्रिया या अत्यंत बोलक्या आहेत.

कोरोना काळानंतर जेव्हा शाळा सुरू होतील तेव्हा प्रशिक्षणास उपस्थित असलेल्या ५७,८१० शिक्षकांना तरी आता काय करावे, कसे करावे असा संभ्रम राहणार नाही हा विश्वास आहे!



वागू जर बेदरकार, प्रशासनावर पडेल भार.

# केबल चॅनलद्वारे शिक्षण

**अर्जुन कोळी**
करड नगरपरिषद शाळा क्र. ३, जि. सातारा.
भ्रमणध्वनी : ९९२११९९४४४

***असे कधी होईल तर मजा खूप येईल...***

*घरातल्या टीव्ही वर शाळा जेव्हा भरेल,*
*दप्तराच्या ओझ्याची कटकट ना उरेल.*
*डोके माझे होईल नवे कॉम्प्युटर,*
*गणितातली उदाहरणे सुटतील भरभर.*
*विषयांच्या सगळ्या टीव्ही वर मालिका होतील,*
*परीक्षेचे पेपर मग अवघड कसे जातील!*
*टीव्ही वरच्या शाळेत*
*मजा खूप येईल,*
*पण खेळाच्या तासांचे*
*कसे काय होईल?*

*बंदच्या काळात मोठी पटसंख्या असलेल्या आपल्या शाळेत ऑनलाईन शिक्षण देण्याचा विचार करीत असताना नवीन प्रयोग करण्याची कल्पना सुचली आणि स्थानिक केबल चालकांची मदत घेऊन ती प्रत्यक्षात उतरवली. उत्तम नियोजन करून सर्व विद्यार्थ्यांना स्थानिक चॅनल वरून शिक्षकांचे पाठ दाखविले जातात. लोक सहभागातून चॅनलचा खर्च भागवून मुलांना शिकते ठेवणाऱ्या या प्रयोगाविषयी....*

वीस वर्षांपूर्वी कवी राम ऐवळे यांची 'टीव्ही वरची शाळा' ही कविता प्रकाशित झाली होती. आज कोरोनाच्या पार्श्वभूमीवर त्या कवितेची आठवण झाली.

२२ मार्च २०२० हा दिवस सर्व भारतीयांच्या स्मरणात कायमस्वरूपी राहील. अवघ्या जगाला कोविड–१९ ने विळखा घातल्यानंतर याच तारखेला संपूर्ण देशात पंतप्रधानांनी लॉकडाऊन जाहीर केला आणि सर्व व्यवहार थांबले. शिक्षणक्षेत्रही त्याला अपवाद नव्हते. यामुळे परीक्षांविना शैक्षणिक सत्र संपवावे लागले आणि ऑनलाईन शिक्षणाचा नवा फंडा उदयास आला. त्याला शाळा क्रमांक ३ ही अपवाद ठरली नाही. बालवाडी ते सातवीपर्यंत २५०० पटसंख्या असलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण द्यायचे तरी कसे? असा मोठा प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला होता. यासाठी शिक्षकांची व शाळा व्यवस्थापन समितीची मते विचारात घेतली आणि २५ मार्च पासून सुरुवातीच्या काळात वर्गशिक्षकांनी आपापल्या वर्गाच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर अभ्यास देण्याचे निश्चित केले. मात्र ही एकतर्फी शिक्षण प्रक्रिया होती. यातून मार्ग काढण्यासाठी पुढे झूम ॲपची मदत घेण्यात आली व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा प्रयत्न झाला. कराड हे निमशहरी गाव आहे. आजूबाजूच्या ४८ गावांतील विद्यार्थी तेथे शिक्षणासाठी येतात. ८५ टक्के पालकांकडे स्मार्ट फोन होते. त्यातही ग्रामीण भागात नेटवर्क व विद्युत पुरवठ्याची कमतरता भासत असल्याने सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे अवघड जात होते, तर अनेक पालक आपला फोन मुलांना हाताळण्यास देण्यासाठी तयार नव्हते. ही समस्या दूर करण्यासाठी शाळेने Facebook Live सुरू केले.

या माध्यमातून मुख्याध्यापक या नात्याने मी पालकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला व शाळेची भूमिका पटवून दिली. त्यामुळे पालकांमध्ये जागरूकता

आली. विद्यार्थ्यांच्या हातात स्मार्ट फोन आले. दरम्यानच्या कालावधीमध्ये केवळ शैक्षणिक ज्ञान न देता कोरोना संदर्भात जनजागृती व्हावी यासाठी काही तज्ज्ञांचे अनुभव पालकांपर्यंत Facebook Live च्या माध्यमातून पोहोचविण्यात आले. याशिवाय काही मानोसपचार तज्ज्ञ, साहित्यिक यांची व्याख्याने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. मुलांना शिक्षणाशिवाय आनंद मिळावा यासाठी शिक्षकांनी गाणी, गप्पा गोष्टी, कविता, कथा यांचा वापर करून संवाद साधण्याचा प्रयत्न केला. दररोज २ तास हा उपक्रम सुरू होता. मे महिन्याच्या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन योगासने, नृत्याचे क्लास यांसारखे उपक्रम घेण्यात आले. त्यामुळे विद्यार्थी घरातच असले तरी त्यांना शाळेत असल्यासारखा आनंद मिळत होता. त्यातून विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यातील नाते दृढ होत गेले.



राज्यामध्ये कोरोनाची परिस्थिती चिंताजनक झाल्याने १५ जूनपासून प्रत्यक्षात शासनाने शैक्षणिक सत्र सुरू केले, मात्र विद्यार्थी घरातच राहिले. त्यामुळे 'शाळा बंद शिक्षण सुरू' ही संकल्पना पुढे आली. कोरोनाची भीती नष्ट व्हावी आणि विद्यार्थी व पालक यांना शैक्षणिक माहिती मिळावी यासाठी १५ जून रोजी शालेय शिक्षण, मंत्री वर्षाताई गायकवाड यांच्याशी शाळेने झूम ॲपद्वारे शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. शिक्षण कशा पद्धतीने घ्यावे यासाठी शिक्षण मंत्री वर्षाताई गायकवाड यांच्यासह प्रधान शिक्षण सचिव वन्दना कृष्णा, शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी, माध्यमिक शिक्षण संचालक दिनकर पाटील यांनी ऑनलाईन शिक्षण पद्धतीबाबत विद्यार्थी व पालक यांच्याशी चर्चा केली.

शाळेची मोठी पटसंख्या पाहता सर्वच विद्यार्थ्यांना शिक्षण देता यावे यासाठी मी नवीन प्रयोग करण्याचा निर्णय घेतला व त्या अंतर्गत स्थानिक केबल चॅनलची मदत घेतली. यासाठी सर्व्हे करण्यात आला. मात्र हा चॅनल सुरू करताना आर्थिक प्रश्न समोर उभा राहिला. शाळेने लिगाडे-पाटील कॉलेजचे संस्थापक, प्राचार्य विजय लिगाडे आणि सामाजिक कार्यकर्ते, राज मेडिकलचे मालक सलीम मुजावर यांची या कामी मदत घेतली. या दोघांनी प्रत्येकी बावीस हजार रुपये केबल चॅनलचे भाडे देण्यासाठी मोठी मदत केली व राज्यातील पहिले केबल चॅनल शाळेने सुरू केले. यासाठी शाळेत मोठा स्टुडिओ उभारण्यात आला. त्या ठिकाणी इयत्ता तिसरी ते सातवीपर्यंत शिक्षकांचे पाठ शूट केले आणि आता रोज सकाळी दोन तास व संध्याकाळी दोन तास याप्रमाणे ते स्थानिक केबल चॅनलवर दाखविण्यात येत आहेत. याचा फायदा कराड व पाटण तालुक्यातील सर्व माध्यमांच्या शाळेतील हजारो विद्यार्थी व शिक्षकांना होत आहे. यापलीकडे जाऊन शाळेने स्वत:चे यू-ट्यूब चॅनल सुरू केले असून शूट केलेले पाठ यू-ट्यूब चॅनलच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात दाखविण्यात येत आहेत. टीव्हीवर शिक्षक प्रत्यक्ष शिकविताना दिसत असल्याने विद्यार्थ्यांना अधिक आनंद होत आहे. या अनोख्या प्रयोगामुळे छोट्या स्क्रीनपासून विद्यार्थ्यांच्या डोळ्यांना होणारा त्रास टळला. पालकांनी त्यांचा स्मार्ट फोन विद्यार्थ्यांच्या हातात दिल्याने त्यांची गैरसोय होत होती. या प्रयोगामुळे तोही प्रश्न सुटला.

अध्यापनासाठी केबल चॅनलचा वापर करणाऱ्या राज्यातील या पहिल्या शाळेने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. शाळेत विविध भागांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय व्हावी व त्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी त्या त्या भागातील २३ सेवानिवृत्त शिक्षकांची मदत घेतली असून हे शिक्षक शाळा



क्र. ३ च्या विद्यार्थ्यांना दररोज दोन तास अध्यापनाचे काम करीत आहेत. त्यामुळे या शाळेतील १०० टक्के विद्यार्थी कोणत्या ना कोणत्या मार्गाने शिक्षण घेत आहेत. सर्वच विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गुगल मीट, गुगल क्लासरूम या ॲपचाही शिक्षकांनी प्रभावीपणे वापर करून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. राज्याच्या शिक्षण विभागाने ऑनलाईन अभ्यास सुरू करण्याचे आदेश दिल्यानुसार शाळा मोबाईलद्वारे विद्यार्थ्यांचा अभ्यास घेत आहेत. टीव्ही द्वारे अभ्यास घेण्याचे शासनाचे नियोजन सुरू असताना त्यापूर्वीच शाळेने पुढाकार घेत स्थानिक केबल चॅनलद्वारे तसेच शाळेचे यू-ट्यूब चॅनल तयार करून १ जुलैपासूनच शिक्षण देण्यास प्रारंभ केला आहे. मोबाईलपेक्षाही स्थानिक केबल चॅनलद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांना घरबसल्या व्यवस्थित शिक्षण घेता यावे यासाठी स्थानिक टीव्ही चॅनलचा वापर केल्याने केवळ पालिकेच्याच नव्हे तर कराड व पाटण तालुक्यातील शाळांतील विद्यार्थ्यांना लॉकडाऊन काळात घरबसल्या ऑनलाईन शिक्षणाचा आनंद मिळत आहे.

**(पृष्ठ क्र. ९ वरून)**

याचबरोबर शाळेच्या वतीने 'माझा कोरोना सुट्टीतील अभ्यास' ही अभ्यासमालाही सुरू ठेवली. यात काही ऑनलाईन टेस्टची निर्मिती करून विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा घेतली. शिक्षकांकडून दररोजचा वेगळा अभ्यासही देण्यात आला. जून महिन्यात मोफत पुस्तकांचे वाटपही करण्यात आले. या वेळी काही विद्यार्थ्यांकडे लेखन साहित्य व पूरक अध्ययन साहित्य नसल्याचे दिसून आले. अशा विद्यार्थ्यांना स्वखर्चाने इंग्रजी शब्दकोश, सुलेखन वही व लेखन साहित्य यांचे वाटप करण्यात आले. यालाही विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. मुलांनी केलेला अभ्यास तपासण्यासाठी व पालकांचे समुपदेशन करण्यासाठी 'शिक्षक आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात आला. गृहभेटीच्या वेळी प्रत्येक पालकांजवळ मुलांच्या अभ्यासाची चौकशी केली. सामाजिक व शारीरिक अंतर पाळून स्वतःच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेऊन अभ्यासगटात शिक्षक-मित्र व विद्यार्थी-मित्र यांच्या समवेत मुलांशी संवाद साधत आहोत. पालकांच्या घरी जाऊन अंगणात व ओट्यावर विद्यार्थ्यांनी केलेला अभ्यास तपासत आहोत. यात प्रामुख्याने उजळणी, शुद्धलेखन, प्रकट वाचन व श्रुतलेखन यांवर आम्ही जास्त भर देत आहोत. याला पालकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या वेळी असे दिसून आले की, ऑनलाईन शिक्षणापेक्षा या ऑफलाईन शिक्षणाला विद्यार्थी व पालकांचा प्रतिसाद जास्त मिळत आहे.

हे कार्य शाळेचे मुख्याध्यापक सुरेश बिरादार यांच्या मार्गदर्शनाखाली, शाळेतील सहकाऱ्यांच्या मदतीने सुरू आहे. यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य तसेच पालक यांची समर्थपणे साथ मिळत आहे. तसेच मुरुड डायटचे प्राचार्य, प्राथमिक शिक्षणाधिकारी व सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांच्या मदतीने 'शाळा बंद'च्या या काळातही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू न देता ते सुरू ठेवण्याचे वेगळेच समाधान आहे.

# एक वाटचाल अद्भुत यशाची

**अर्चना जिडकुंटावार**
जि. प. उच्च प्राथ. शाळा धानापूर, जि. चंद्रपूर
भ्रमणध्वनी : ८३२९१३५७०५

देशावर कोरोनाचे संकट आलेले असताना विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आपल्या देशात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता राज्य शासनाच्या निर्देशानुसार १७ मार्च २०२० पासून सगळ्या शाळा काही काळासाठी बंद करण्यात आल्या. दिवसागणिक कोरोनाची लागण राज्यात वाढतच गेली आणि शाळा पुन्हा सुरू होण्याचे काहीच चिन्ह दिसेना. आता मुलांच्या शिक्षणाचे काय होणार? हा प्रश्न पालक व शिक्षकांसमोर उभा राहिला. बऱ्याच कालावधीपासून मुले शाळेपासून दूर होती. यावर उपाय म्हणून 'शाळा बंद, शिक्षण सुरू' ही संकल्पना पुढे आली. या अंतर्गत ऑनलाईन शिक्षण सुरू करण्याचे आवाहन शासनाने केले. शहरी भागातील खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण सुरू झाले, पण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षणाची संकल्पना मृगजळामागे धावण्यासारखी होती. 'शाळा बंद शिक्षण सुरू' या शासनाच्या ऑनलाईन शिक्षणाच्या आवाहनाला प्रतिसाद देत मी सर्वप्रथम माझ्या शाळेतील सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांचा व्हॉट्सअॅप ग्रुप तयार केला. विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास देणे सुरू केले.

> *इच्छा असली की मार्ग सापडतो. सगळ्यांकडे स्मार्ट फोन नाहीत म्हणून अडून न बसता व्हॉट्सअॅप, एसएमएसद्वारे स्वाध्याय पाठविण्याची कल्पना शिक्षकांनी उचलून धरली. अभ्यास गट तयार झाले. विषयवार स्वाध्याय निर्मिती करून मुलांपर्यंत पोहोचविण्यात यश आले. प्रत्यक्ष कॉल करूनही मुलांना अडेल तेथे मार्गदर्शन केल्यामुळे गोंडपिंपरी तालुक्यातील केंद्रातील आदिवासी विद्यार्थी शिक्षण प्रवाहात आले त्याविषयी.....*

राज्यस्तरावरून येणारी अभ्यासमालिका विद्यार्थ्यांपर्यंत नियमित पोहोचविली. सर्व विद्यार्थ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल नसल्यामुळे ३० टक्के विद्यार्थीच त्या ग्रुपमध्ये सहभागी होते. आपल्या ज्ञानाचा उपयोग तालुक्यातील विद्यार्थ्यांना व्हावा यासाठी मी सर्व केंद्रप्रमुखांशी चर्चा करून तालुक्यातील विद्यार्थ्यांचा 'किलबिल गोंडपिपरी' नावाचा व्हॉट्सअॅप समूह तयार केला. त्यात विविध उपक्रम देण्यात येत होते परंतु ग्रामीण भागातील ज्या विद्यार्थ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल नाही, अशा ७० टक्के विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे हा सर्वात मोठा प्रश्न होता. ज्यांच्याकडे अँड्रॉइड मोबाईल होता ते विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात होते, पण ज्यांच्याकडे अँड्रॉइड मोबाईल नाही अशा विद्यार्थ्यांचे नुकसान होत होते. अशा विद्यार्थ्यांसाठी काय करता येईल ही तळमळ मनात होती. ग्रामीण भागातील पालकांकडे अँड्रॉइड मोबाईल असण्याचे प्रमाण फारच कमी, पण साधा मोबाईल असणाऱ्या पालकांचे प्रमाण बऱ्यापैकी होते. अँड्रॉइड मोबाईल असला तरी डाटा पॅक मारलेला आहे का? नेटवर्क प्रॉब्लेममुळे व्हिडिओ बघता येतो का? अशा परिस्थितीत ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना

शिक्षणाच्या प्रवाहात कसे आणता येईल? ऑनलाईन शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत कसे नेता येईल? असे विविध प्रश्न मनात रेंगाळत असताना एक कल्पना सुचली. साध्या मेसेजद्वारे अभ्यास... ऑनलाईन मोबाईलसाठी व्हॉट्सॲपवर मेसेज व ऑफलाईन मोबाईलवर साध्या मेसेजद्वारे स्वयंनिर्मित स्वाध्याय पोहोचवून जर कॉलद्वारे विद्यार्थ्यांचा आढावा घेतला तर नक्कीच आपण जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकतो. ही कल्पना सुचली खरी... पण ती वास्तवात आणणे अवघड होते परंतु हे ध्येय कोणत्याही परिस्थितीत गाठायचे हे मनाशी ठरवून मी माझ्या ओळखीतील शिक्षकांशी चर्चा केली. तेव्हा काहीजण माझ्या संकल्पनेला हसले तर काहींनी ही गोष्ट शक्य नसल्याचे सांगितले. तेव्हा भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ. कलाम सरांचे एक वाक्य आठवले की, जर कोणी तुमच्या ध्येयाला हसत असेल तर तुमचे ध्येय सर्वोत्तम आहे, असे समजावे. त्यांचा हा विचार आठवून मी प्रेरित झाले.

आता पुढचा प्रवास सुरू झाला. या प्रवासादरम्यान एका उपक्रमशील व समविचारी शिक्षक आदरणीय राजेश्वर अम्मावार यांच्याशी चर्चा झाली. त्यांना ही संकल्पना खूप आवडली. येथूनच ध्येयाकडे वाटचाल सुरू झाली. चर्चेतून असे ठरले की, या कार्यासाठी तालुक्यातील उपक्रमशील, होतकरू शिक्षकांचा सहभाग घ्यायचा. ठरल्याप्रमाणे आम्ही शिक्षकांना फोन करून, व्हॉट्सॲपच्या माध्यमातून या चळवळीत सहभागी होण्यासाठी विनंती केली. दहा जणांपैकी दोघांनी होकार दिला. असे करता करता १५ लोकांची टीम तयार झाली. या शिक्षकांना घेऊन 'अभ्यासगट गोंडपिपरी' नावाचा व्हॉट्सॲप समूह तयार करण्यात आला. गोंडपिपरी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी धनराज आवारी यांना उपक्रमाबाबत माहिती देऊन अभ्यासगट गोंडपिपरी समूहात सामील करून घेतले. तेव्हा त्यांनी मला प्रोत्साहन देऊन कार्य करण्यास प्रेरित केले. दोन दिवस आणखी शिक्षक मिळतील का याची वाट पाहिली, पण प्रतिसाद मिळाला नाही. जे या चळवळीत सहभागी झाले त्यांच्यासोबत समूहात चर्चा करून त्या शिक्षकांना, ते ज्या विषयाचे अध्यापन करीत आहेत, ते विषय व वर्ग स्वाध्याय निर्मितीसाठी देण्यात आले. स्वाध्यायाचे स्वरूप कसे असावे, स्वाध्याय कसा तयार करावा, त्याची अंमलबजावणी कशी करावी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर आणखी काही शिक्षक अभ्यासगटाला जोडले गेले आणि आमची ३५ जणांची टीम तयार झाली. आमच्या कार्याला सुरुवात झाली.

### उद्दिष्टे :

१) ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.

२) 'आजचा स्वाध्याय' या नावीन्यपूर्ण उपक्रमातून पाठ्यक्रम पूर्ण करणे.

३) शासनाच्या ऑनलाईन अभ्यासाची संकल्पना वास्तवात आणणे.

४) ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययनाची सवय लावणे.

### कार्यवाही :

अभ्यासगटातील सर्व सदस्य शिक्षक पहिली ते आठवीचे इयत्तानिहाय, सर्व विषय निहाय स्वनिर्मित स्वाध्याय तयार करून आदल्या दिवशी समूहात चर्चेसाठी ठेवतात. त्यानंतर सर्व स्वाध्याय एकत्रित करतात. आलेले स्वाध्याय तपासण्यात येतात. साध्या मेसेजद्वारे स्वाध्याय लिहून त्या घटकांशी संबंधित व्हिडिओची लिंक टाकण्यात येते. ज्या विद्यार्थ्यांकडे अँड्रॉइड फोन आहे ते विद्यार्थी लिंक वरून व्हिडिओ बघू शकतात. गोंडपिपरी तालुक्यातील एकूण ८ केंद्राच्या शिक्षकांच्या व्हॉट्सॲप समूहापर्यंत स्वाध्याय

पोहोचविण्यासाठी स्वाध्याय दूतांची निवड करण्यात आली आहे. दिनांक ११ जुलै २०२० पासून ठीक सकाळी आठ वाजता अभ्यासगटावर इयत्ता पहिली ते आठवी वर्गांचे सर्व विषयांचे स्वाध्याय टाकण्यात येतात आणि स्वाध्याय दूत संपूर्ण स्वाध्याय प्रत्येक केंद्राच्या शिक्षक समूहापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करतात. प्रत्येक शिक्षक केंद्राच्या समूहावर आलेल्या स्वाध्यायांतील आपल्या वर्गाचे स्वाध्याय निवडून आपल्या वर्गाच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर किंवा साधा मोबाईल असणाऱ्या विद्यार्थ्यांना एसएमएसद्वारे फॉरवर्ड करतात. विद्यार्थ्यांना स्वाध्याय मिळाला की नाही, याबाबत पालकांना फोन करून विचारणा करतात व त्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करतात.

### आलेल्या अडचणींवर उपाय :

अभ्यास गटाद्वारे दिला जाणारा स्वाध्याय हा अँड्रॉइड मोबाईल व साध्या मोबाईलवर पाठविता येईल असा तयार करण्यात आलेला आहे. साध्या मोबाईलवर स्वाध्याय फॉरवर्ड होत नसेल तर



आजचा स्वाध्याय बाबत आढावा घेताना शिक्षक

१) पालकांनी त्यांच्या मोबाईलमध्ये असलेले अनावश्यक sms (मेसेजेस) delete करणे आवश्यक आहे.

२) SMS द्वारे स्वाध्याय जात नसेल तर स्वाध्याय पाठविताना त्यातील आवश्यक नसलेला भाग delete करून आवश्यक तेवढा स्वाध्याय आपल्या विद्यार्थ्यांना फॉरवर्ड करणे.

### सहभागी विद्यार्थी :

हा उपक्रम गोंडपिपरी तालुक्यातील एकूण आठ केंद्रातील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांसाठी असून तालुक्यातील अधिकाधिक विद्यार्थी 'आजचा स्वाध्याय' या उपक्रमाच्या माध्यमातून अभ्यास करीत आहेत. सोबतच गोंडपिपरी तालुक्यातील शिक्षकांच्या संपर्कात येणारे जिल्ह्यातील शिक्षक स्वखुशीने आजचा स्वाध्याय नियमित आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवीत आहेत.

### सहकार्य :

गोंडपिपरी तालुक्यातील आठही केंद्रांचे केंद्रप्रमुख या उपक्रमाला शुभेच्छा देऊन सहकार्य करीत आहेत. 'आजचा स्वाध्याय' उपक्रमाला विनोद लवांडे (अधिव्याख्याता, DIET चंद्रपूर) यांनी शुभेच्छा देऊन अभ्यासगटाद्वारे करीत असलेल्या कार्याची प्रशंसा केली. या कार्यात माझ्या संकल्पनेला पूर्ण प्रतिसाद देऊन कार्य करणारे राजेश्वर अम्मावार यांचे मला अतिमोलाचे सहकार्य लाभत आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आमच्या अभ्यासगटात स्वप्रेरणेने सामील होऊन नियमित स्वाध्याय तयार करणाऱ्या आमच्या शिक्षकवृंदांचे मला मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे.

### परिणाम :

या उपक्रमाच्या आधी ग्रामीण आदिवासी भागातील फक्त अँड्रॉइड मोबाईल असणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविले जात होते, ज्याचे प्रमाण अत्यल्प होते. या उपक्रमामुळे ग्रामीण आदिवासी गोंडपिपरी तालुक्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यात येत आहे. ग्रामीण आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले असून विद्यार्थ्यांना स्वाध्याय मिळाल्यानंतर ते स्वतः अभ्यास करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची सवय लागली आहे. प्रत्येक केंद्रात संबंधित शिक्षक आपल्या गरजेनुसार

(पृष्ठ क्र. २८ वर)



कोरोनाचा कठीण काळ, घराबाहेर जाणे टाळ.

# Learning with Lockdown

**मृणाल गांजाळे**
जि. प. आदर्श प्राथ. शाळा पिंपळगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे.
भ्रमणध्वनी : ९७६६६२५५८०

मित्रांनो, 'संधीचे सोने करा' हे बोलण्याचा काळ गेला आता! संधी निर्माण करा तरच या स्पर्धेच्या युगात आपला आणि आपल्या नवीन पिढीचा निभाव लागेल. कोविड-१९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर जगातील जवळजवळ सर्वच शाळा बंद आहेत. लाखो विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबले आहे. ग्रामीण भागात शिक्षणासाठी एकच पर्याय असतो तो म्हणजे जिल्हा परिषद शाळा, पण कोरोनामुळे तोच पर्याय बंद झाला. पूर्ण जगभरातील शाळा बंद झाल्या आहेत. एक संकट ही सुद्धा एक संधी असते. या दृष्टिकोनातून विचार करीत आम्ही Learning with Lockdown हा उपक्रम सुरू केला. आंबेगाव तालुक्यातील प्रसिद्ध शाळा म्हणजे जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा पिंपळगाव तर्फे महाळुंगे, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे. ही शाळा नेहमीच गुणवत्तेच्या बाबतीत प्रसिद्ध आहे. लॉकडाऊन असताना ही शाळा आजही सुरू आहे असे म्हणायला हरकत नाही. आपणांस प्रश्न पडला असेल की, हे कसे शक्य आहे? तर मायक्रोसॉफ्टच्या माध्यमातून ऑनलाईन स्वरूपात पिंपळगावची शाळा सुरू आहे.

> *पुणे जिल्ह्यातील पिंपळ गावच्या शाळेत Microsoft Teams नावाच्या ऑनलाईन सॉफ्टवेअरद्वारे अध्यापन सुरु आहे. तंत्रस्नेही शिक्षकांच्या प्रयत्नांनी या विद्यार्थ्यांना देशोदेशीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधता आला. विदेशातील शिक्षकांकडूनही शिकण्याची संधी मिळाली. स्काइप इन द क्लास रूम उपक्रमाद्वारे हे कसे शक्य झाले. त्या विषयी.....*

मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या Microsoft Teams नावाच्या ऑनलाइन सॉफ्टवेअर द्वारे अध्यापन सुरू आहे. या अंतर्गत शाळेतील प्रत्येक शिक्षक आणि विद्यार्थ्याला पुढीलप्रमाणे ई-सेवा मिळाल्या आहेत.

- स्वतःचे स्वतंत्र ई-मेल (५० जीबी मेल बॉक्स)
- वनड्राइव्ह क्लाऊड फाईल स्टोअरेज (१ टीबी)
- वर्ड, एक्सेल, पॉवरपॉइंट, वन नोट (वेब व मोबाईल)
- ॲक्टिव्ह डिरेक्टरी
- फॉर्म्स (सर्वेक्षण, अभिप्राय, प्रश्नोत्तर यांसाठी)
- स्वे (डिजिटल साईट-साठी)
- स्ट्रीम (व्हिडिओसाठी)
- क्लासनोट : कंप्लायंस आणि राईट्स व्यवस्थापन
- कस्टम ॲप उदा. फ्लीपग्रीड
- माईनक्राफ्ट (गेम बेस्ड स्टेम लर्निंग)
- टिम्स (व्हर्च्युअल क्लास, ऑडिओ व्हिडिओ सेशन)
- यामर (चॅटसाठी)
- व्हाईट बोर्ड (डिजिटल लिखाण)
- Microsoft Teachers Community Education Center for Free Courses

प्रत्येक विद्यार्थ्याचा आणि शिक्षकाचा आय डी **ऑफिस ३६५** हा आहे.

शाळेतील सर्व शिक्षकांना आधी या संदर्भातील प्रशिक्षण देण्यात आले. त्या अनुषंगाने त्यांनी काम सुरू केले आहे. सुरुवातीपासूनच आमच्या शाळेमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये शिष्यवृत्ती, विविध स्पर्धा परीक्षा, वेगवेगळे उपक्रम आणि तंत्रज्ञानाचे विविध उपक्रम आम्ही घेतो. सध्याच्या बंदच्या काळात मायक्रोसॉफ्टच्या मदतीने वेगवेगळ्या गेस्ट स्पीकरचे सेशन आम्ही आयोजित केले होते आणि आभासी क्षेत्रभेट द्वारे विद्यार्थी घरी असताना देखील रणजितसिंह डिसले या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सोलापूरचे विज्ञान केंद्र दाखविले. सरांसोबत लर्निंग विथ लॉकडाऊन हा उपक्रम केला आणि विद्यार्थ्यांनी वेगवेगळी पोस्टर्स बनविली. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी १० दिवस आपण किती पाणी वापरतो, किती वीज वापरतो, वातावरण कसे बदलते याची नोंद घेतली आणि त्याचा एक आलेख तयार केला. यामुळे विद्यार्थ्यांना प्रदूषणाबद्दलची माहिती मिळाली आणि आपण विजेचा किंवा पाण्याचा कसा वापर करतो हे त्यांच्या लक्षात आले.

वेगवेगळ्या देशातील विद्यार्थ्यांबरोबर हितगुज करायला मिळाले. हे सर्व शक्य झाले ते 'स्काइप इन द क्लास रूम' या उपक्रमांतर्गत.

रशियातील Nadezhda Ivanova या शिक्षिकेने रशियाची संस्कृती आभासी क्षेत्रभेट द्वारे दाखविली तेव्हा शाळेतील आयुष पोखरकर या विद्यार्थ्याने स्वतः च्या घरातील गोठा दाखविला आणि तो रशियाच्या मॅडमना खूपच आवडला. Manuela या पोर्तुगालच्या शिक्षिकेसोबत प्लॅस्टिक ब्रीज प्रकल्प, Ming Yao या शिक्षिकेसोबत तैवान शाळेची भेट, व्हिएतनाम सोबत मिस्त्री स्काईप, ब्राझील, थायलंड शाळेसोबत संवाद, दिल्लीतील शिवानी रावत व्यंकटेश्वर स्कूल मार्फत योगा डे, वर्ल्ड एनव्हॉयर्नमेंट डे, हेल्दी फूड, गूड इटिंग हॅबिट्स असे वेगवेगळे प्रकल्प जाणून घेत तेथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. निमोणकर मॅडम यांनी जपान या देशातील विद्यार्थ्यांबरोबर मिस्त्री स्काईप हा खेळ खेळला. श्री. पालेकर सर उत्तम प्रकारे PDF तयार



करून विद्यार्थ्यांच्या अध्यापनासोबत इतर शिक्षकांनाही सहकार्य करीत असतात.

शाळेचा पट ४५० आहे. आता दुसरी ते पाचवी पर्यंतचे वर्ग सध्या ऑनलाईन सुरू आहेत. पहिलीची प्रवेश प्रक्रिया देखील आम्ही ऑनलाईन केली होती. पहिलीचे वर्ग काही कालावधी नंतर सुरू करण्याचा प्रयत्न आहे. वरील उपक्रम आम्ही मे–जून या महिन्यांमध्ये केले होते. मुले मोबाईलद्वारे कनेक्ट होतात. शिक्षक स्वत:च्या नियोजनाप्रमाणे वेगवेगळे विषय पीपीटी, व्हिडिओ किंवा प्रत्यक्ष फळा वापरून ३० ते ४० मिनिटे शिकवितात. विद्यार्थी प्रतिसाद आणि विद्यार्थ्यांचे वय विचारात घेऊन शिकविले जाते. साधारण ५० ते ७५ टक्के मुले कनेक्टेड आहेत आणि हळूहळू मुलांचा प्रतिसाद देखील वाढत आहे. शाळेतील शिक्षक चिखले सर व पोखरकर मॅडम यांनी केलेल्या 'जुना मोबाईल शाळेत द्या' या आवाहनास अतिशय उत्तम प्रतिसाद देत इ. तिसरीच्या कु. समृद्धी उत्तम गोसावी या विद्यार्थिनीच्या पालकांनी एक जुना पण चांगल्या स्थितीतील अँड्रॉइड मोबाईल एका गरीब, गरजू विद्यार्थ्याला दिला. आमच्या प्रयत्नांना त्यांचे हे योगदान बळ देणारे आहे. यातून सामाजिक बांधिलकीचा धडा इतरांना मिळेल.

Flipgrid या ॲप द्वारे विद्यार्थी दररोजचे व्हिडिओ तयार करून त्याचे संकलन करतात. यामध्ये इंग्रजी कविता, मराठी कविता, वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टींचे वाचन अशा प्रकारच्या व्हिडिओंचे आम्ही संकलन केले आहे. मागील दोन वर्षे हा उपक्रम शाळेत सुरू आहे. या उपक्रमाच्या सादरीकरणासाठी या वर्षी ऑस्ट्रेलियात सिडनी येथे मायक्रोसॉफ्टच्या जागतिक शिक्षण परिषदेमध्ये माझी निवड झाली आहे. मायक्रोसॉफ्ट Teams चे प्रशिक्षण प्रथमतः सर्व शिक्षकांना दिले आणि आता प्रत्येक शिक्षक त्याचा वेगवेगळ्या प्रकारे वापर करीत आहे. यामध्ये आम्ही काहुत सॉफ्टवेअर द्वारे विद्यार्थ्यांना वेगवेगळे गेम्स देतो, ज्यातून मुले खेळातून शिकतात. 'स्काईप इन द क्लास रूम'च्या माध्यमातून मुले इतर देशांना भेटी देतात. Flipgrid मार्फत शाळेसाठी थेट अमेरिकेहून वेगवेगळ्या प्रकारची बक्षिसे प्राप्त झाली आहेत. Flipgrid या ॲपची सध्या तोंडी कामात मदत होते. वेकलेड या सॉफ्टवेअर द्वारे शिकविताना शिक्षकांना रिसोर्सेस उपलब्ध होतात. सध्या शाळेतील विद्यार्थी शर्विल सुनील वाघ Minecraft नावाचा एक गेम शिकत आहे. त्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार दिले जाते. हा एक वेगळ्या प्रकारचा गेम असून त्यामध्ये विद्यार्थी स्वतःचेच world तयार करतात आणि स्वतः च्या कल्पनाविश्वात वावरल्याप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारची क्रिएशन्स प्रकल्पानुसार तयार करतात. यामध्ये शर्विल एक स्पेस रोलर बनवीत आहे.

लॉकडाऊनच्या काळात वेगवेगळ्या शिक्षकांना वेगवेगळ्या प्रकारची प्रशिक्षणे देण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्ह्यांमधील शिक्षक समाविष्ट झाले होते. या लॉकडाऊनच्या परिस्थितीत देखील आम्ही विद्यार्थ्यांच्या, पालकांच्या आणि शिक्षकांच्या संपर्कात आहोत आणि वेगवेगळ्या माध्यमांतून का होईना विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू आहे. शाळेतील सर्व शिक्षक मिळून हे सर्व उपक्रम राबवितात. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्ताराधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी या सर्वांचे मार्गदर्शन मिळते. सर्व गावकरीही भरभरून कौतुक करीत साथ देतात. पालकांचे सहकार्य लाभले आणि विद्यार्थ्यांनी साथ दिली यांमुळे हे शक्य झाले.

■■■

# वर्क फ्रॉम होम

**डॉ. रविंद्र आंबेकर,**
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
अमरावती.

कोविड-१९ अर्थात कोरोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी दि. १६ मार्च २०२० पासून अमरावती जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शाळेत जाणे बंद झाले. विद्यार्थ्यांचे नियमित शिक्षण सुरू होणार की नाही ही अनिश्चितता लक्षात घेता, मा. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती यांनी दि. १८ मार्च २०२० रोजी 'स्टडी फ्रॉम होम' कार्यक्रमाच्या नियोजनाकरिता पहिली सभा आयोजित केली. संस्थेतील वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा समन्वयक (समावेशित शिक्षण) व विषय सहायक यांच्याबरोबर चर्चा करून कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यात आली. लगेच दि. १९ मार्च २०२० रोजी जिल्ह्यातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी, केंद्रप्रमुख व निवडक तंत्रस्नेही शिक्षक यांची झूम मीटिंग घेऊन कार्यक्रमाचे स्वरूप निर्धारित करण्यात आले.

> *जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावतीच्या प्राचार्यांनी शाळा लवकर सुरू होण्याची शक्यता नाही हे लक्षात घेऊन दूरदृष्टीने 'स्टडी फ्रॉम होम' कार्यक्रमाचे काटेकोर नियोजन केले. तज्ज्ञ, तंत्रस्नेही शिक्षकांकडून दर्जेदार ऑनलाईन शैक्षणिक साहित्य विकसित केले. त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित केले आणि मुलांचे शिक्षण सुरू ठेवले त्या विषयी....*

### कार्यक्रमाची उद्दिष्टे :

१) शाळांमधून शिक्षण शक्य होत नसले तरी तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवणे.

२) अमरावती जिल्ह्यातील अधिकाधिक शिक्षकांना शिकविण्याकरिता प्रेरित करणे.

३) अमरावती जिल्ह्यामध्ये दिक्षा ॲपचा व Los SMART Q App चा प्रचार व प्रसार करणे.

४) विषय सहायक, विषय साधनव्यक्ती व शिक्षक यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांकरिता दर्जेदार ऑनलाईन शैक्षणिक साहित्य विकसित करणे.

### कार्यक्रमाची कार्यप्रणाली :

कार्यक्रमाची माहिती पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांसह शिक्षकांपर्यंत तात्काळ पोहोचण्याकरिता जिल्हा स्तरावरून तालुका-निहाय शिक्षकांच्या व अधिकाऱ्यांच्या झूम मीटिंग आयोजित करण्यात आल्या. या झूम मीटिंग द्वारे सर्वांना कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाईन शिक्षणाद्वारे ज्ञानगंगा पोहोचविण्याकरिता अधिकाधिक शिक्षकांना प्रेरित करण्यात आले. 'स्टडी फ्रॉम होम' अंतर्गत सर्वप्रथम शिक्षकांना सूचित करण्यात आले की, वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे व्हॉट्सॲप ग्रुप तयार करावेत. तयार करण्यात आलेल्या व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने विद्यार्थी व पालक यांच्या

संपर्कात रहावे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे याकरिता शिक्षकांना झूम मीटिंगद्वारे ऑनलाईन क्लासेस, गुगल फॉर्म, यू-ट्यूब, दिक्षा ॲप इत्यादी बाबींच्या वापराकरिता प्रोत्साहन देण्यात आले. शिक्षकांसह विषय सहायक व विषय साधनव्यक्तींनी विद्यार्थ्यांकरिता विविध ऑडिओ, व्हिडिओ शैक्षणिक साहित्य तसेच विविध विषयांवर गुगल फॉर्म विकसित केले. या सर्व प्रयत्नांद्वारे कोरोना संक्रमणाच्या काळात सुद्धा विद्यार्थ्यांच्या शिकण्यामध्ये खंड पडणार नाही याची काळजी घेण्यात आली. उल्लेखनीय बाब म्हणजे जिल्हा समन्वयक (समावेशित शिक्षण) व विषय साधनव्यक्ती (समावेशित शिक्षण) यांच्या प्रयत्नांतून दिव्यांग विद्यार्थ्यांचेही शिक्षण सुरू राहील याकरिता प्रयत्न केले गेले. तसेच 'स्टडी फ्रॉम होम' कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या इयत्ता पहिली ते बारावीच्या शाळांनी सहभाग घेतला. प्राप्त झालेल्या माहितीमधून काही यशोगाथा तयार करण्यात आल्या. 'स्टडी फ्रॉम होम' कार्यक्रमांतर्गत पर्यवेक्षकीय अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विषय सहायक व विषय साधनव्यक्ती यांचे द्वारा केलेल्या कार्याची माहिती दि. १ मे २०२० ते ७ मे २०२० या कालावधीत गुगल लिंकद्वारे संकलित केली.

त्यामध्ये एकूण ७६७ व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आले. त्यात ९२,३०७ विद्यार्थी सहभागी झाले. त्या माध्यमातून ३१८ झूम मीटिंग घेण्यात आल्या. या झूम मीटिंगमध्ये १५,५४१ विद्यार्थी सहभागी झाले. या सर्व व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून विषय साधनव्यक्ती, विषय सहायक व शिक्षक यांनी तयार केलेल्या गुगल लिंकची संख्या ही ४५७१ असून ८१,७९८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन चाचण्या सोडविल्या. यांपैकी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ४७,००३ इतकी होती. त्याच काळात एकूण ८८२ ऑडिओ क्लिप तयार करण्यात आल्या. ९२० व्हिडिओ तयार करण्यात आले. ऑडिओ आणि व्हिडिओ यांची संख्या ७९० होती. ही सामग्री एकूण ९४,९१५ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात यश आले.

सदर उपक्रमात सहभागी झालेले पदनिहाय प्रतिसाद पुढीलप्रमाणे :

प्राथमिक शिक्षक (४०५), विषय शिक्षक (४९), माध्यमिक शिक्षक (२००), कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक (२२), मुख्याध्यापक (५१), पर्यवेक्षीय अधिकारी (३), विषय साधनव्यक्ती (५६), विषय सहायक (६) अशा एकूण ७९२ व्यक्ती सदर उपक्रमात सहभागी झाल्या होत्या.

**कार्यक्रमाची फलनिष्पत्ती :**

- प्रस्तुत कार्यक्रमामुळे कोरोना संक्रमणाच्या कालावधीमध्ये शाळांमधून शिक्षण होत नसले तरी तंत्रज्ञानाच्या मदतीने अमरावती जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहिले.
- अमरावती जिल्ह्यातील शिक्षकांनी तंत्रज्ञान आत्मसात करून विद्यार्थ्यांना शिकविले. अमरावती जिल्ह्यामध्ये दिक्षा ॲपचा वापर वाढला.
- शिक्षकांसह विषय सहायक व विषय साधनव्यक्ती यांनी विविध प्रकारचे ऑडिओ, व्हिडिओ, शैक्षणिक साहित्य निर्माण केले. तसेच विविध विषयांवरील 'गुगल फॉर्म' चे विकसन केले. या सर्व साहित्याला हजारो विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.
- विद्यार्थ्यांना शिकण्याचा आनंद मिळाला. शिक्षकांना शिकविण्याचा आनंद मिळाला. पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' ही संकल्पना अंमलात आणली याचा आनंद झाला व समाधान प्राप्त झाले.
- मोर्शी तालुक्यातील शिक्षिका स्वाती सवाई यांनी राबविलेल्या उपक्रमांबाबत पालकांनी दिलेले

अभिप्राय स्वयंस्पष्ट होते. तसेच जिल्ह्यातील ४७,८९९ पालकांच्या प्रतिक्रिया प्राप्त झाल्या.

त्यांपैकी १३,९२८ प्रतिक्रिया सदर उपक्रम उत्कृष्ट असल्याबाबतच्या आहेत. दि. १७ जून २०२० या कालावधीत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावतीच्या वतीने 'शिक्षक व्यावसायिक विकास ई–मंच' (Teachers Professional Development E-Forum) तयार करून जिल्ह्यातील स्वेच्छेने नोंदणी केलेल्या ३२६७ शिक्षकांना ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणामध्ये LFE, Pune यांचे सत्र सुद्धा आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षित शिक्षकांना प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर अंतिम चाचणी घेऊन प्रमाणपत्र देण्यात आले. सदर प्रशिक्षण सुरू असताना Zoom Meeting आयोजित केल्या होत्या व Facebook Live चा सुद्धा वापर करण्यात आला होता. त्याचे व्हिडिओ https://www.facebook.com/diet.amravati.३/ या फेसबुक पेजवर उपलब्ध आहेत.

१) https://youtube/Gatd९lkCEF

२) https://youtube/ ५ racU-CWIOo

३) https://youtube/umh३ PWBht ४E

सद्य:स्थितीत अमरावती जिल्ह्यातील शिक्षण सुरू रहावे याकरिता 'शिक्षक मित्र' हा उपक्रम मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे प्रेरणेतून सुरू करण्यात आला असून शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांचे समन्वयाने सदर उपक्रम राबविण्यात येत आहे.

१०० टक्के मुले शिकली पाहिजेत याकरिता, विद्यार्थ्यांना अभ्यासगट निहाय स्वयंअध्ययन करण्यास प्रेरित करण्यासाठी गावातील निवडक शिक्षित तरुण विद्यार्थी किंवा पालक मदत करीत आहेत. कोविड १९ चे सर्व नियम व अटींच्या अधीन राहून उपक्रम राबविण्यात येत आहे.

■■■

---

**(पृष्ठ क्र. २२ वरून)**

स्वाध्याय निवडून पालकांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर किंवा साध्या मोबाईलवर मेसेजद्वारे स्वाध्याय देऊन, विद्यार्थ्यांना कॉल करून किंवा प्रत्यक्ष भेटीतून वैयक्तिक मार्गदर्शन करीत आहेत. प्रत्येक केंद्रातील शिक्षकांना येणाऱ्या समस्या अभ्यासगट समूहामध्ये शेअर केल्या जातात. त्या समस्येवर अभ्यासगटात उपाय शोधून समस्येचे निराकरण केले जाते. पालक आपल्या पाल्याचा स्वाध्याय आवडीने त्यांच्याकडून सोडवून घेत आहेत. 'कोरोनाच्या काळात गोंडपिपरी तालुक्यातील उपक्रमशील शिक्षक विद्यार्थ्यांसाठी करीत असलेले कार्य कौतुकास्पद आहे' अशा पालकांच्या प्रतिक्रिया येत आहेत. या उपक्रमाचे पालकांकडून खूप कौतुक केले जात आहे.

**पालकांचे मनोगत व्यक्त करतानाचा व्हिडिओ**

**तालुक्यातील शिक्षकांचे मनोगत व्यक्त करतानाचा व्हिडिओ**

■■■

# व्हिज्युअल ते व्हर्च्युअल

**अमर घाटगे**
केंद्रप्रमुख, शिरगाव, जि. रत्नागिरी

महाराष्ट्रामध्ये मार्च महिन्याच्या उत्तरार्धात कोरोनाची साथ शिक्षण क्षेत्रामध्ये एक संक्रमणाची लाट घेऊन आली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अनिश्चित काळासाठी शाळा बंद करण्यात आल्या. शाळा बंद राहण्याचा कालावधी वाढणार आहे हे जाणवताच महाराष्ट्र राज्यामध्ये 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' या अभिनव उपक्रमाची अंमलबजावणी सुरू झाली. याचाच एक भाग म्हणून मे महिन्यात महाराष्ट्र राज्यामधील केंद्र प्रमुखांसाठी 'केंद्र प्रमुख शैक्षणिक नेतृत्व विकास' हा प्रशिक्षण कार्यक्रम वेबिनारच्या माध्यमातून राबविला गेला. खऱ्या अर्थाने या वेबिनारमुळे कोरोना कालावधीमधील केंद्रप्रमुख म्हणून आपल्या जबाबदारीची मला अधिक जाणीव झाली व त्यानुसार माझ्या केंद्रातील सर्व मुलांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी मी काय करू शकतो याचा विचार सुरू झाला. बदलत्या आव्हानात्मक परिस्थितीमध्ये मुलांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी 'व्हिज्युअल ते व्हर्च्युअल' या उपक्रमाचे केंद्र स्तरावर नियोजन करण्याचे ठरविले.

> *शाळा बंद काळात मुलांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी शिरगाव केंद्रप्रमुखांनी व्हिज्युअल ते व्हर्च्युअल उपक्रमाचे केंद्र स्तरावर नियोजन केले आणि माहिती तंत्रज्ञान साक्षरतेसंबंधी शिक्षक व पालकांना साद्यंत माहिती देण्यासाठी विविध उपक्रम राबविले. व्हिडिओ कॉन्फरन्स, झूम मीटिंग, गुगल मीट तंत्रज्ञान कार्यशाळा यामधून ऑनलाईन शिक्षण सहज, सोपे वाटेल अशा पद्धतीने तयारी करून मुलांचे शिक्षण कसे सुरू ठेवले त्या विषयी....*

**गरज :** आजपर्यंतच्या शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांना समोर पाहण्याची सवय होती तसेच शिक्षकांना देखील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिकविण्याचा अनुभव होता. आता शाळा बंद असताना व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहून शिकण्याची सवय असताना, विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी एकमेव पर्याय होता तो म्हणजे 'ऑनलाईन' शिक्षणाचा, पण या पर्यायामध्ये देखील अनेक समस्या होत्या. जसे की, साधनांची उपलब्धता मर्यादित असणे, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद, पालकांची भूमिका, शिक्षकांचे तांत्रिक ज्ञान, आर्थिक समस्या, आरोग्यविषयक प्रश्न, इत्यादी. या समस्यांचा बाऊ करून उपयोग नाही हे लक्षात आले. कारण कोणत्याही क्षेत्रामध्ये समस्या असतातच. त्या समस्यांकडे आपण संधी म्हणून पाहिले तर खऱ्या अर्थाने आपल्याला स्वत:ला सिद्ध करता येईल. ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून आपण हे करू शकलो तर समाजामध्ये, पालकांमध्ये मुलांचे शिक्षण सुरू आहे हा संदेश जाईल म्हणून मी खऱ्या अर्थाने माझे शिरगाव केंद्र शैक्षणिक दृष्ट्या व्हर्च्युअल करण्याचा निश्चय केला.

**उद्दिष्टे :**

१) शाळा बंद पण शिक्षण सुरू या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे. २) तंत्रज्ञानाच्या

वापरासाठी शिक्षकांना प्रेरित करणे. ३) शिक्षकांनी स्वत: ई-साहित्याची निर्मिती करणे. ४) व्हर्च्युअल शिक्षणासाठी पालकांचे सहकार्य घेणे.

**कालावधी :** १ जून ते ३१ जुलै २०२० (६० दिवस)

**उपक्रमाची अंमलबजावणी :**

सर्वांत प्रथम 'Digital Literacy', 'तंत्रज्ञान साक्षरता' या संकल्पनेसंदर्भात काम करण्याचे ठरविले. फक्त व्हॉट्सॲप मेसेज, विविध लिंक फॉरवर्ड करणे म्हणजे तंत्रज्ञान साक्षरता नव्हे, तर त्यापुढे जाऊन शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्या दृष्टीने तंत्रज्ञानाचा उपयोग शैक्षणिक दृष्टीने करण्यासाठी, शिक्षणप्रक्रिया अधिक सोपी आणि आनंददायी करण्यासाठी तंत्रज्ञानाची संकल्पना, साहित्य, उपयुक्तता, संशोधन या सर्व गोष्टी व्यापक अर्थाने समजून घेणे म्हणजे तंत्रज्ञान साक्षरता होय. हा विचार शिक्षक व पालकांमध्ये पोहोचविण्यासाठी सुरुवातीला नियोजनपूर्वक खालील उपक्रम राबविले :

**१) ऑडिओ कॉन्फरन्स कॉल :** संवादातून शिकण्याची प्रक्रिया अधिक सोपी होते. संवादामुळे एकमेकांना जाणून घेण्याची संधी मिळते. एकमेकांच्या प्रतिक्रिया समजतात. प्रतिक्रियांचा अभ्यास करून अनेक निष्कर्ष काढता येतात. अनेकदा या प्रतिक्रिया संवादाच्या माध्यमातून सहज अनुभवता येतात म्हणून सुरुवातीला पाच ते सहा शाळांचे मुख्याध्यापक यांचा गट करून त्यांच्याशी ऑडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क साधला व हेच तंत्र त्यांनी विद्यार्थ्यांच्या बाबतीत सुरुवातीला वापरावे असे सांगितले. त्यामुळे शिक्षक एकाच वेळी एकाच वर्गातील पाच ते सहा विद्यार्थ्यांशी ऑडिओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क साधू लागले. विद्यार्थ्यांना आपले सहकारी मित्र कसे बोलत आहेत ते ऐकता येऊ लागले. एका अर्थाने विद्यार्थ्यांना ही गोष्ट आकर्षित करीत होती व व्हर्च्युअल लर्निंगसाठी आमचा मार्ग सुकर होत होता.

**२) व्हिडिओ कॉल :** शिक्षण प्रक्रियेमध्ये दृक्श्राव्य साधनांचे खूप महत्त्व आहे. ऑडिओ कॉन्फरन्समध्ये येणाऱ्या समस्या सुरुवातीला व्हिडिओ कॉलद्वारे कमी करण्याचा प्रयत्न केला. जाणीवपूर्वक शिक्षक विद्यार्थ्यांना व्हिडिओ कॉल करू लागले. आपले शिक्षक प्रत्यक्ष स्क्रीनवर पाहून विद्यार्थ्यांना आनंद झाला व त्यातूनच अत्यंत मोकळ्या वातावरणामध्ये अध्ययनासंदर्भात शिक्षक विद्यार्थ्यांशी चर्चा करू लागले. अगदी हसत-खेळत वेगवेगळ्या विषयांतील माहिती सांगू लागले. या टप्प्यावर आम्हांला खास करून इयत्ता पहिली ते चौथी उत्तम प्रतिसाद मिळाला. मराठी विषयांतर्गत विद्यार्थी आवडीने व्हिडिओ कॉलिंगमध्ये कविता, गायन, नाट्यीकरण सादर करू लागले.

**३) व्हिडिओ कॉन्फरन्स :** व्हिडिओ कॉलमध्ये फक्त शिक्षक आणि विद्यार्थी यांचा समोरासमोर संपर्क होत होता. हे प्रमाण वाढविण्यासाठी एक आठवडाभरासाठी व्हिडिओ कॉन्फरन्स या तंत्राचा नियोजनपूर्वक उपयोग केला. विद्यार्थ्यांना मोबाईलवर आपले सहाध्यायी, आपले शिक्षक प्रत्यक्षात दिसू लागले. अध्ययन-अध्यापन अधिक गतिशील होऊ लागले.

**४) शिक्षक झूम मीटिंग :** व्हिज्युअल ते व्हर्च्युअल या उपक्रमामध्ये झूम मीटिंग या तंत्रज्ञानाचा उल्लेखनीय उपयोग झाला. शिक्षकांना देखील हे तंत्रज्ञान नवीन होते, तसेच एकाच वेळी आपण आपल्या घरी असून देखील आपल्या सर्व सहकाऱ्यांना पाहू शकतो, ऐकू शकतो याचा शिक्षकांना देखील आनंद झाला. या उपक्रमामध्ये झूम मीटिंगचा शैक्षणिक उपयोग करण्यासाठी अत्यंत सूक्ष्म नियोजन केले. यासाठी शिक्षकांना व्हॉट्सॲपच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष फोनद्वारे प्रशिक्षण दिले. तसेच झूम ॲप्लिकेशनच्या तांत्रिक बाजू स्पष्ट केल्या व नजीकच्या काळामध्ये या तंत्राचा आपल्याला आपल्या विद्यार्थ्यांसाठी उपयोग करायचा आहे यासाठी शिक्षकांची मानसिकता तयार केली. अत्यंत खेळीमेळीच्या


रात्रंदिन झटतात कोरोना योद्धे, होऊ नतमस्तक त्यांच्यापुढे

अनौपचारिक वातावरणामध्ये सुरुवातीला झूम सभा घेतल्यामुळे शिक्षकांनी त्यांना येणाऱ्या तांत्रिक समस्या अडचणी सहजपणे विचारल्या व प्रत्येकाने हे आधुनिक तंत्रज्ञान आत्मविश्वासाने आत्मसात केले.

**५) गुगल मीट शिक्षण परिषद :** झूम मीटिंगमध्ये आम्हांला वेळेची मर्यादा येऊ लागली. चाळीस मिनिटांनंतर सभा पुन्हा घ्यावी लागत असे. त्यामुळे गुगल मीट या प्लॅटफॉर्मचा शैक्षणिक दृष्ट्या विचार करायचे निश्चित केले व त्याचेच पहिले पाऊल म्हणून गुगल मीट शिक्षण परिषदेचे आयोजन केले. यामध्ये 'शिक्षण व तंत्रज्ञान' या विषयासंदर्भात मार्गदर्शन करून गुगल मीट या ॲप्लिकेशनच्या शैक्षणिक उपयोजनासंदर्भातील सर्व मुद्‌द्यांची प्रात्यक्षिकासह चर्चा केली.

**६) गुगल मीट तंत्रज्ञान कार्यशाळा :** गुगल मीट या ॲप्लिकेशनचा विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी उपयोग करताना प्रत्यक्ष मीटिंग कशी आयोजित करावी, विद्यार्थ्यांना कसे सहभागी करून घ्यावे, सभेची लिंक कशी क्रिएट करावी, आपली स्क्रीन कशी शेअर करावी इत्यादी सर्व बाबींचे प्रात्यक्षिक करून घेतले, तसेच शिक्षकांसाठी गुगल फॉर्म निर्मिती कार्यशाळा घेतली. शिक्षकांनी ऑनलाईन टेस्ट निर्मिती करण्यासाठी याचा उत्तम प्रकारे उपयोग केला.

**७) शिक्षकांसाठी ऑनलाईन मानसोपचार तज्ज्ञांचे मार्गदर्शन :** कोरोना कालावधीमध्ये आपण सर्वजण वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जात आहोत. यामध्ये विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांचा देखील समावेश आहे. या परिस्थितीचा या शैक्षणिक घटकांवर मानसिक दृष्ट्या कोणता परिणाम होत आहे व त्याचा सामना आपण कसा करायचा आहे व आपले मानसिक स्वास्थ्य उत्तम कसे ठेवायचे यासाठी 'मन:स्वास्थ्याची पाठशाळा' या विषयासंदर्भात झूम मीटिंगमध्ये मानसोपचार तज्ज्ञांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. त्याचा फायदा शिक्षकांना तर झालाच, पण त्यांनी या संदर्भात आपले विद्यार्थी व पालक यांचे देखील समुपदेशन केले.

**८) गुगल मीट विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धा :** माझे विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या प्रत्येक साधनाचा व पद्धतीचा सराव करीत होते. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी गुगल मीट या प्लॅटफॉर्मचा उपयोग आत्मविश्वासाने करावा या उद्दिष्टाची पूर्तता होण्यासाठी विद्यार्थ्यांची 'लोकमान्य टिळकांचे जीवनकार्य' या विषयासंदर्भात ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली. प्रत्येक शाळेतून इयत्ता पाचवी ते सातवी मधील एका विद्यार्थ्याने स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धेची नोंदणी देखील ऑनलाईन गुगल फॉर्ममध्ये केली गेली.

**९) शैक्षणिक ऑडिओ, व्हिडिओ फाईल्स व पीडीएफ निर्मिती :** शिक्षणाच्या व्हर्च्युअल मोडचा अत्यंत प्रभावीपणे उपयोग करण्यासाठी प्रत्येक शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांच्या गरजा व संपादणूक पातळी लक्षात घेऊन घटकनिहाय ऑडिओ, व्हिडिओ व पीडीएफ तयार करण्याचे ठरविले. याचाच परिणाम म्हणून जवळजवळ २५० प्रकारचे ई-साहित्य केंद्रामध्ये निर्माण झाले.

**१०) गृहभेटी :** काही शाळांच्या परिसरामध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी नाही. तसेच जवळजवळ ३० टक्के विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन उपलब्ध नाहीत. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये म्हणून शिक्षक काही ठरावीक दिवशी अशा विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष घरी जाऊन भेट घेऊ लागले व त्यांनी त्यांचा अभ्यास कसा करायचा या संदर्भात त्यांच्या पालकांना लेखी वेळापत्रक देऊ लागले व ठरावीक वेळेनंतर वेळापत्रकानुसार कार्यवाही होत आहे का, याचा आढावा घेऊ लागले.

**११) ऑनलाईन पालक भेट :** 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' या उपक्रमांतर्गत पालकांना तंत्रज्ञानाच्या संदर्भात काही समस्या येत आहेत का हे जाणून घेण्यासाठी तसेच त्यांच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंदर्भात त्यांच्या मनामध्ये

सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी, पालकांशी शाळानिहाय वेळापत्रकाप्रमाणे फोनद्वारे संपर्क करण्याचे ठरविले. या संपर्कामध्ये विशेष करून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक बाबींसंदर्भात चर्चा केली. पालकांसाठी आणि माझ्यासाठी देखील हा नवीन आणि वेगळाच अनुभव होता, पण शिक्षक नियमितपणे विद्यार्थ्यांच्या संपर्कात असल्यामुळे पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाबद्दल आता काळजी राहिली नाही हे त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होत होते. पालक अत्यंत उत्साहाने आपली मुले अभ्यास कसा करीत आहेत हे ठळक नोंदींसह सांगत होते. काही पालकांनी कनेक्टिव्हिटी संदर्भात येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा केली.

**१२) ऑनलाईन शाळा भेट :** कोरोना कालावधीमध्ये प्रत्यक्ष शाळा भेट शक्य नव्हती. त्यामुळे शाळा भेटीचा व्हर्च्युअल अनुभव कसा घेता येईल यासाठी नियोजन केले. प्रत्येक दिवशी पाच शिक्षकांशी फोनद्वारे संपर्क साधण्याचे नियोजन केले. या फोन कॉलमध्ये त्या शिक्षकांनी दिवसभर काय काय काम केले याची चर्चा केली. शिक्षकांना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. शक्य असेल त्यांना तांत्रिक मदत केली तसेच व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून त्यांचे विद्यार्थी जो अभ्यास करीत आहेत त्या संदर्भात विद्यार्थ्यांनी काढलेले फोटो व शिक्षकांनी त्यावर दिलेले प्रत्याभरण यांच्या नोंदी ऑनलाईन पाहिल्या व आवश्यक तेथे चर्चा केली. तसेच या प्रक्रियांमध्ये आढळून आलेल्या चांगल्या व सकारात्मक बाबी लगेच इतर शिक्षकांना सांगितल्या. काही शाळा गुगल मीट अध्यापन करीत आहेत. त्यांच्या गुगल मीट वर्गामध्ये जॉईन होऊन प्रत्यक्ष अध्यापनाचे निरीक्षण केले. शिक्षकांनी घेतलेल्या ऑनलाईन टेस्ट व त्यांचे एक्सेलमधील रिझल्ट पाहिले.

वरील सर्व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या मनामध्ये तंत्रज्ञानाच्या वापरासंदर्भात आत्मविश्वास निर्माण झाला व शाळा बंद असून देखील शिक्षण सुरू असल्याचा अनुभव सर्वांनी घेतला. या उपक्रमामुळे, सकारात्मक दृष्टिकोनामुळे 'व्हिज्युअल ते व्हर्च्युअल' असा शिक्षणाचा प्रवास आम्ही सर्व करीत आहोत.

**फलनिष्पत्ती :**

१) वार्षिक नियोजनाप्रमाणे शिक्षकांनी विषय निहाय, घटक निहाय स्वत: शैक्षणिक व्हिडिओ व ऑडिओ तयार केले. शिक्षकांनी स्वत: तयार केलेले व्हिडिओ एकूण संख्या - ११०, ऑडिओ फाईल्स एकूण संख्या - ११४. २) गुगल मीट या प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांची ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा घेतली. प्रत्येक शाळेतील एक विद्यार्थी सहभागी झाला होता. ३) काही शाळांमध्ये गुगल मीट द्वारे प्रत्यक्ष अध्यापन सुरू झाले. ४) गुगल फॉर्म द्वारे शिक्षक ऑनलाईन टेस्ट घेऊ लागले. ५) विविध शैक्षणिक अॅप संदर्भात पालक स्वत:हून माहिती विचारू लागले. ६) व्हॉट्सअॅपद्वारे पालक व विद्यार्थी नियमित अभ्यासासंदर्भातील कृतींचे फोटो, व्हिडिओज पाठवू लागले. ७) गुगल मीट शिक्षण परिषद आयोजित केली. ८) ज्या शाळेत विद्यार्थी पटसंख्या कमी आहे व जेथे स्मार्टफोन उपलब्ध नाहीत, तेथे ऑडिओ कॉन्फरन्सद्वारे एकाच वेळी चार विद्यार्थ्यांशी संपर्क साधला जातो व हे काम नियमित होत आहे.

आता केवळ प्रशासकीय माहितीच्या देवाण-घेवाणीसाठी तंत्रज्ञानाचा वापर मर्यादित राहिला नाही तर, शिक्षक, विद्यार्थी व पालक हे शैक्षणिक दृष्ट्या व्हर्च्युअल झाले आहेत. बदलत्या काळाबरोबर आम्ही बदलू शकलो याचा आनंद आहे. आता आमच्या शिरगाव केंद्रातील विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आनंदाने शिकत आहेत. अत्यंत उत्साहाने ऑनलाईन टेस्ट सोडवीत आहेत. खऱ्या अर्थाने विद्यार्थी व्हर्च्युअल शैक्षणिक अनुभव घेत आहेत.

# ऑफलाईन शिक्षणासाठी अभ्यास गट उपक्रम

**विनीत पद्मवार**
जि. प. प्रा. शाळा, कोयनगुडा, जि. गडचिरोली.
भ्रमणध्वनी : ९४०४८२३३९०

मार्च २०२० पासून कोरोनामुळे लॉकडाऊन जाहीर झाला आणि मुलांच्या आवाजाने गजबजणाऱ्या नियमित शाळा बंद झाल्या. संपूर्ण देशात प्रत्यक्ष शिक्षण बंद झाले आणि ऑनलाईन शिक्षणाला सुरुवात झाली. गडचिरोली जिल्ह्यातील आमचा भामरागड तालुका अतिदुर्गम, अतिमागास, नक्षलग्रस्त, आदिवासीबहुल व अविकसित आहे. येथे ऑनलाईन शिक्षण कदापि शक्य नाही. एकमेव BSNL टॉवर. नेटवर्कची अडचण तर आहेच, पण जिथे आमच्या गरीब आदिवासींचा एकवेळच्या जेवणाचा प्रश्न गंभीर आहे, तिथे अशा पालकांकडे स्मार्टफोन कुठून असणार? मुले या शाळा बंद काळात शिक्षणापासून दूर राहिली तर शाळाबाह्य होतीलच परंतु सर्वांत मोठा धोका म्हणजे शाळाबाह्य झाल्याने कदाचित नक्षलवादी चळवळीत सामील होण्याचा धोका संभवेल. अशा चळवळीमध्ये मुले सामील होणे हे देशहितासाठी योग्य नव्हे, या गोष्टीचा विचार होणे आवश्यक होते.

> *गडचिरोली जिल्ह्यातील कोयनागुड येथील शाळेत 'अभ्यास गट उपक्रम' सुरुच होता. शाळा बंदच्या सद्य:स्थितीत ऑफलाईन शिक्षणाला उत्तम पर्याय म्हणून या अभ्यास गट उपक्रमाचा कसा उपयोग करून घेण्यात आला आणि मुलांचे शिक्षण कसे सुरू राहिले त्याविषयी....*

दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना घरपोच पाठ्यपुस्तके मिळाली. परंतु आता पुढे काय? केवळ पाठ्यपुस्तके देऊन मुलांना फायदा होणार नव्हता कारण जून महिना म्हटलं की शेतीची कामे सुरू होतात व पालक स्वतः मुलांना शेतात काम करायला घेऊन जातात. यामुळेच आम्ही आमच्या जि. प. प्रा. शाळा, कोयनगुडा येथे ऑफलाईन शिक्षण म्हणून 'अभ्यासगट उपक्रम'ची सुरुवात केली. तशी अभ्यासगट उपक्रम ही कल्पना मागील दोन वर्षांपासून आमच्या तालुक्यात व शाळेत मा. अश्विनी सोनावणे (ग. शि. भामरागड) यांच्या मार्गदर्शनाखाली चालूच होती परंतु सद्य:स्थितीत ऑफलाईन शिक्षणाला उत्तम पर्याय म्हणून सदर अभ्यासगट उपक्रम उपयुक्त झाला. याविषयी आम्ही २६ जून २०२० रोजी शाळा व्यवस्थापन समिती सभेमध्ये तसा ठरावही घेतला व दि. १ जुलै २०२० पासून कार्यवाही सुरू केली.

### अभ्यासगट उपक्रमाची उद्दिष्टे :

१) पाच ते सहा विद्यार्थ्यांचा गट करून गटात अध्ययन करणे. २) सर्व वर्गांच्या विद्यार्थ्यांचा गटात समावेश करून त्यातील एका विद्यार्थ्याने गटप्रमुख म्हणून कार्य करणे. ३) मागील सत्रातील अभ्यासक्रमाची उजळणी घेणे व दृढीकरण करणे. ४) प्रत्यक्ष चर्चेतून, संवादातून विचारांची देवाणघेवाण करणे. ५) शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक, शिक्षक यांचे सहकार्य घेत काम करणे. ६) अभ्यासात सातत्य टिकवून ठेवणे. ७) अभ्यासासोबत जीवन कौशल्यांवर आधारित उपक्रम राबविणे.

८) किमान २ ते ३ तास प्रत्यक्ष अभ्यास आणि गणित व भाषा पेटीतील साहित्याचा वापर करणे. ९) अध्ययन समृद्धी कार्यक्रमाच्या वर्कशीट सोडविणे.

अशी विविध उद्दिष्टे समोर ठेवून सदर अभ्यासगट तयार करण्यात आला. दररोज सकाळी ३ तास व सायंकाळी २ तास याप्रमाणे नियोजन केले. ५ ते ६ विद्यार्थ्यांचा गट केल्याने गर्दी होणार नव्हती. सोबतच सर्व विद्यार्थ्यांची हजेरी पुस्तिका तयार केली. मुले स्वतःच हजेरी घेतात. यामध्ये भाषा विषयात प्रकट वाचन, कविता, गायन, पाठावर आधारित प्रश्न तयार करणे, संवाद लिहिणे, शब्द डोंगर, अनुलेखन, श्रुतलेखन, गोष्ट तयार करणे, गोष्ट सांगणे, दिनक्रम सांगणे, चित्रवर्णन, चित्रावरून गोष्ट तयार करणे असे उपक्रम घेतले जातात.

पहिलीच्या वर्गामध्ये जे विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी शाळापूर्व तयारीमध्ये मातीपासून गोळे तयार करणे, तांदूळ व डाळ वेगळे करणे. कागदकाम इत्यादी उपक्रम घेतले जातात. गणित विषयात गणित पेटीतील साहित्य वापरून संख्या ओळख, संख्यावाचन, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार या मूलभूत क्रिया करणे, पाढे पाठांतर, शाब्दिक उदाहरणे तयार करणे, भौमितिक आकृत्या काढणे, इ. उपक्रम घेतले जातात. इंग्रजी विषयामध्ये मुलांना कविता, संवाद ऐकविणे, संभाषण घेणे, शब्द, वाक्य तयार करणे, सोपे शब्द वाचन करणे, इंग्रजी शब्दकोश वापरणे इत्यादी. तसेच परिसर अभ्यास या विषयामध्ये परिसरातील विविध झाडांची पाने गोळा करणे व त्या झाडाचे नाव, उपयोग सांगणे तसेच पानांपासून पत्रावळी तयार करणे इत्यादी उपक्रम घेतले जातात. ज्या विद्यार्थ्यांना वाचण्यात वा गणित सोडविण्यात अडचण येते त्या विद्यार्थ्यांना सहकारी विद्यार्थी मदत करतात. एकमेकांपासून मुले खूप छान शिकतात व दुसऱ्यांना शिकविण्याचा हा वेगळाच आनंद मुलांना मिळतो. विषयमित्र व अभ्यासमित्र म्हणून वरच्या वर्गातील विद्यार्थी खालच्या वर्गातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात, तर शिक्षक दररोज वा एकदिवसाआड प्रत्यक्ष गटांना भेट देऊन मार्गदर्शन करतात. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक हे दररोज अभ्यासगट उपक्रमाला भेटी देतात. या उपक्रमाचा महत्त्वाचा फायदा म्हणजे मुले प्रत्यक्ष अनुभवातून शिकतात. सोबतच जीवन कौशल्यांवर आधारित विविध उपक्रम जसे – रंगकाम, पर्यावरणाचे शिक्षण आदी उपक्रम घेतले जातात. मुलांनी प्रत्यक्ष नैसर्गिक रंग वापरून आपल्या घराच्या भिंतींवरच उत्कृष्ट चित्रे काढली, तर काही मुलांनी शाळेच्या भिंतींवर चित्रे काढली आहेत. सोबतच स्वच्छता उपक्रमामध्ये आठवड्यातून एक दिवस रविवारी शालेय परिसर तथा गाव स्वच्छ करणे हा उपक्रम घेतला जातो. अभ्यास– गटामध्ये सर्व विद्यार्थी मास्क किंवा रुमालाचा वापर करतात आणि वेळोवेळी साबणाने हात धुतात.

सदर अभ्यासगट उपक्रमाची दखल मा. शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड यांनी घेतली. दि. ८ जुलै २०२० रोजी झूम मीटिंगद्वारे माझ्याशी प्रत्यक्ष संवाद साधून उपक्रमाचे कौतुक केले व शुभेच्छाही दिल्या.

### अभ्यासगट उपक्रमाचे फायदे

१) मुलांच्या शिक्षणात खंड पडला नाही व दररोज शिक्षण सुरू राहिले. २) गटामध्ये केवळ पाच ते सहा विद्यार्थी असल्याने सामाजिक/शारीरिक अंतर व कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन करता आले. ३) प्रत्येक गटात गटप्रमुख असल्याने सर्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष समजावून सांगण्यास मदत झाली. ४) शाळा बंद असली तरीही आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरूच राहिले. ५) अध्ययन स्तर वाढण्यास मदत झाली. ६) विद्यार्थी शाळाबाह्य होण्यापासून रोखण्यात यश आले. ७) प्रत्यक्ष कृतीतून मुलांना शिकण्याचा आनंद मिळाला.

अशा प्रकारे कोरोना काळात ऑफलाईन शिक्षणाला उत्तम पर्याय म्हणून अभ्यासगट उपक्रम उपयुक्त ठरला. मुलांना अभ्यासाची गोडीही लागली. आता दररोज नित्य नियमाने मुले अभ्यास करतात आणि शिकतात.

■■■

# तंत्रस्नेही शिक्षकांच्या कौशल्याचे सक्षमीकरण

**बी. बी. पाटील**
पी. एस. तोडकर हायस्कूल वाकरे, ता. करवीर,
जि. कोल्हापूर,

लॉकडाऊन सुरू झाल्यानंतर शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यासंबंधी काही प्रमुख समस्या आमच्या समोर होत्या. अर्थात मुलांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी काही तरी उपाययोजना करायला हवी होती. याबाबत अनेक सहकाऱ्यांशी चर्चा केली. पालकांशी बोललो, शिक्षण क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. तंत्रस्नेही चळवळीतील माझे सहकारी मित्र शिरगाव हायस्कूल शिरगाव, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील तंत्रस्नेही अध्यापक एस. एन. आत्तार यांच्याशी चर्चा केली. तंत्रस्नेही चळवळीत काम करणारे महाराष्ट्रातील माझे सहकारी यांच्याशी चर्चा केली आणि मग त्यातून या लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये मुलांचे शिक्षण सुरू रहावे यासाठी कोणती उपाययोजना करता येईल यावर विचार केला.

> *लॉकडाऊनच्या काळात 'शाळा बंद शिक्षण सुरू' या राज्य शै. सं. व प्र. परिषदेच्या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'तंत्रस्नेही शिक्षक माध्यमिक समूह महाराष्ट्र' या समूहाची स्थापना झाली व त्या माध्यमातून शिक्षकांसाठी ऑनलाईन प्रशिक्षण सुरू झाले. या प्रशिक्षणामुळेच मुलांचे ऑनलाईन शिकणे सुकर झाले. सध्याची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षकांनी एकत्र येऊन केलेल्या या प्रयत्नाविषयी....*

लॉकडाऊन कालखंडामध्ये मुलांचे शिक्षण सुरू ठेवणे हे सर्वांसमोर आव्हान होते. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून 'शाळा बंद शिक्षण सुरू' या मथळ्याखाली दररोजचा अभ्यास येत होता, पण त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी तंत्रज्ञान, कौशल्य, उपलब्ध साधने, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि विशेष म्हणजे हे सर्व करण्याची मानसिकता असणारा शिक्षक आणि पालक वर्ग अशा अनेक गोष्टींची मर्यादा होती.

या कालावधीत मुलांचे शिकणे सुरू राहण्यासाठी शासकीय धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी काय करता येईल, यासाठी राज्यस्तरावर माध्यमिक शिक्षण विभागामध्ये काम करणाऱ्या तंत्रस्नेही शिक्षकांची एक ऑनलाईन मीटिंग घेतली. त्यामध्ये या सर्व प्रश्नांची आणि या प्रश्नांच्या समाधानासाठी काय उपाययोजना करायची यावर प्रामुख्याने चर्चा घडवून आणली.

यामध्ये प्रामुख्याने खालील बाबी लक्षात आल्या व काही निर्णय घेण्यात आले :

१) लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये ऑनलाईन शिक्षण सुरू ठेवण्यासाठी माध्यमिक विभागाकडे प्रशिक्षित मनुष्यबळ कमी आहे.

२) त्याचबरोबर ऑनलाईन शिक्षणासाठी आवश्यक असणारी कौशल्ये अनेक शिक्षक बांधवांच्याकडे नाहीत.

३) यासाठी राज्यस्तरावर माध्यमिक शिक्षकांसाठी स्वयंप्रेरणेने प्रशिक्षण आयोजित करण्याची गरज आहे.

४) प्रशिक्षण, मार्गदर्शन, तसेच तयार केलेले ई–साहित्य शेअरिंग करण्यासाठी एक राज्यस्तरीय प्लॅटफॉर्म व्हॉट्सॲप सारख्या माध्यमातून तयार करण्यात यावा.

५) फिजिकल प्रशिक्षण शक्य नसल्याने ऑनलाईन प्रशिक्षण तातडीने सुरू करण्यात यावे. त्यामुळे शिक्षकांना मदत होईल, त्याचबरोबर शिक्षक सक्षम होऊन आपल्या विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार ई–साहित्य तयार करतील. तयार केलेले साहित्य राज्यस्तरीय व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून राज्यभर पोहोचवावे.

६) शिक्षकांनी तयार केलेले साहित्य तज्ज्ञ तंत्रस्नेही शिक्षकांनी पहावे व सुधारण्यासाठी मार्गदर्शन करावे, ज्या माध्यमातून दर्जेदार ई–लर्निंग साहित्य उपलब्ध होईल.

७) कालावधीचा विचार करता विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू राहण्यासाठी ऑनलाईन टीचिंगसाठी उपयुक्त असणारे गुगल मीट, गुगल क्लासरूम, जिओ मीट, झूम मीटिंग, मायक्रो सॉफ्टवेअर यांसारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मची ओळख करून देणे.

सदर मीटिंगमध्ये झालेल्या निर्णयानुसार कार्यवाही सुरू झाली. विचारांची व साहित्याची देवाणघेवाण करण्यासाठी तंत्रस्नेही शिक्षक माध्यमिक समूह महाराष्ट्र (Techno Savvy Teacher Secondary Maharashtra) या समूहाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील कमीत कमी पाच तंत्रस्नेही माध्यमिक शिक्षकांचा समावेश करण्यात आला. या समूहाच्या माध्यमातून दिनांक २ एप्रिल २०२० पासून तातडीने ऑनलाईन प्रशिक्षण सुरू करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये प्रमुख्याने खालील विषयांचा समावेश करण्यात आला.

१) 'दिक्षा ॲप'चा प्रभावीपणे वापर करणे. यामध्ये 'दिक्षा ॲप' इन्स्टॉल करणे, 'दिक्षा ॲप'मधील व्हिडिओ शेअर करणे, डाऊनलोड करणे याचा समावेश करण्यात आला.

२) व्हॉट्सॲप ग्रुप तयार करणे, त्यांची विविध सेटिंग करणे, 'दिक्षा ॲप'मधील व्हिडिओ लिंकच्या माध्यमातून व्हॉट्सॲपवर शेअर करणे, येथे उपलब्ध असलेले ऑनलाईन साहित्य शोधून ते आपल्या वर्गाच्या व्हॉट्सॲप ग्रुपवर पाठविणे, मुलांनी केलेला अभ्यास व्हॉट्सॲपच्या माध्यमातून स्वीकारण्यासाठी विविध माध्यमे वापरणे यांचा समावेश करण्यात आला.

३) गुगल फॉर्म व टेक्स्ट मेसेजच्या साहाय्याने ऑनलाईन मूल्यमापनासाठी प्रश्नपत्रिका तयार करणे, या फॉर्ममध्ये आपल्या विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेले व्हिडिओ, चित्रे व इतर लिंक समाविष्ट करणे, ऑनलाईन मूल्यमापन करीत असतानाच विद्यार्थ्यांनी प्रश्नपत्रिका सबमिट केल्यानंतर त्यांना तात्काळ उत्तरसूची मिळणे व मूल्यमापन तात्काळ उपलब्ध करणे यांचा समावेश करण्यात आला.

४) गुगलच्या विविध सुविधांचा अध्ययन–अध्यापनामध्ये प्रभावीपणे वापर करणे, यामध्ये जी–मेल, गुगल मॅप, यू–ट्यूब अकांऊट तयार करणे, त्यावर स्वतः चे व्हिडिओ अपलोड करणे, स्वतःचे साहित्य मुलांना उपलब्ध करून देण्यासाठी ब्लॉग तयार करणे, गुगल ट्रान्सलेशनचा वापर करणे, गुगल सर्चच्या माध्यमातून विविध माहिती मिळविणे, गुगल ड्राईव्हचे व्यवस्थापन आणि गुगलचा वापर.

५) शिक्षकांनी स्वतःचे ई–लर्निंग साहित्य तयार करावे यासाठी व्हिडिओ एडिटिंग, ऑडिओ एडिटिंग, व्हिडिओ शूटिंग यांच्याशी संबंधित तांत्रिक माहितीचा समावेश केला.

६) पॉवर पॉईंटचा प्रभावीपणे वापर करून व्हिडिओ तयार करणे.

७) ॲनिमेशनचा वापर करून व्हिडिओ तयार करणे.

८) तयार केलेले ई–लर्निंग साहित्य विविध माध्यमांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मचा वापर करणे.

९) गुगल मीट, गुगल क्लासरूम, जिओ मीट, झूम मीटिंग यांसारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मची ओळख करून देणे.

सदर प्रशिक्षणासाठी यू-ट्यूब लाईव्ह, मायक्रो सॉफ्टवेअर, गुगल मीट, टीम लिंक अशा अनेक ऑनलाईन प्लॅटफॉर्मचा वापर केला. त्याला राज्यातील शिक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला. सध्याच्या लॉकडाऊन कालखंडाचा विचार करता ऑनलाईन शिक्षण सुरू ठेवण्यासाठी तंत्रस्नेही प्रशिक्षण अत्यंत गरजेचे असल्याने शिक्षकांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात लाभला. प्रशिक्षणानंतर शिक्षकांच्या शंका समाधानासाठी जिल्हास्तरीय व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आले. त्यातून त्यांच्या शंकांचे निरसन व त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

दिनांक २ एप्रिल ते २० जून २०२० या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील जवळपास पाच हजार शिक्षकांनी याचा लाभ घेतला. आता जिल्हास्तरावर तंत्रस्नेही शिक्षक माध्यमिक समूहाची टीम आपापल्या परीने प्रशिक्षणाचे आयोजन करीत आहे. त्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रशिक्षित झालेल्या अनेक शिक्षकांनी स्वतःचे e-content बनविणे सुरू केले असून ते आपल्या विद्यार्थ्यांना शेअर करीत आहेत. त्याचबरोबर स्वतःचे यू-ट्यूब चॅनल, ब्लॉग या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत ई-लर्निंग साहित्य पोहोचवीत आहेत. विशेषतः स्मार्ट पीडीएफ सारख्या माध्यमातून अनेक शिक्षकांनी आपल्या विषयाशी संबंधित एका-एका पाठ्यपुस्तकाचे संपूर्ण व्हिडिओ, पीडीएफ व इतर साहित्य एकाच स्मार्ट पीडीएफच्या माध्यमातून उपलब्ध करून दिलेले आहे.

त्याचबरोबर राज्यातील शिक्षकांना मायक्रोसॉफ्ट एज्युकेशन या शिक्षकांसाठी असलेल्या जागतिक प्लॅटफॉर्मची ओळख व्हावी व शिक्षकांनी त्यातील उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे यासाठी तंत्रस्नेही शिक्षक माध्यमिक समूहाच्या माध्यमातून राज्यातील शिक्षकांसाठी प्रशिक्षणाची पाच सत्रे आयोजित केली. आज राज्यातील अनेक माध्यमिक शिक्षकांनी मायक्रोसॉफ्ट इनोव्हेटिव्ह एज्युकेटर (MIE) हे प्रमाणपत्र मिळविलेले आहे. त्याचबरोबर अनेक माध्यमिक शिक्षकांनी मायक्रोसॉफ्ट इनोव्हेटिव्ह एज्युकेटर एक्सपर्ट (MIEE) या प्रमाणपत्रासाठी आपले सादरीकरण केले आहे. तंत्रस्नेही शिक्षक माध्यमिक समूहाने सामूहिकपणे केलेल्या प्रयत्नांचेच हे यश आहे.

या प्रशिक्षणाच्या संचलनासाठी यू-ट्यूब चॅनल, ब्लॉग व जिल्हावार तयार करण्यात आलेले व्हॉट्सअॅप ग्रुप यांचा वापर करण्यात आला. तंत्रस्नेही शिक्षकांसाठी लागणारी विविध प्रकारची सॉफ्टवेअर्स व मोबाईल ॲप्लिकेशन्स प्रशिक्षणार्थींना सहज उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र तंत्रस्नेही शिक्षक (maha tsts.blogspot.com) हा ब्लॉगही तयार करण्यात आला आहे. त्याचबरोबर दररोजच्या प्रशिक्षणाचे व्हिडिओ, यू-ट्यूब चॅनल, ब्लॉग, व्हॉट्सअॅप ग्रुप इ. माध्यमातून शिक्षकांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांना उपलब्ध करून दिले.

या समूहाच्या माध्यमातून शिक्षकांनी तयार केलेले साहित्य म्हणजे व्हिडिओ, ऑडिओ, पीडीएफ, ऑनलाईन मूल्यमापनासाठी टेस्ट यांसारखे प्रचंड ई-लर्निंग साहित्य, आज राज्याच्या विविध व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून तसेच यू-ट्यूब, ब्लॉग व स्मार्ट पीडीएफ च्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले जात आहे, याचा एक शिक्षक म्हणून मला सार्थ अभिमान वाटतो.

कोणताही शासकीय आदेश नसताना केवळ सध्याची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्रातील माध्यमिक शिक्षकांनी एकत्र येऊन केलेला हा प्रयत्न अतिशय यशस्वी ठरला आहे.

■■■

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन शिक्षणाची संधी

**विजया अवचार**
सक्षमीकरण समन्वयक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नाशिक.

परिवर्तन हे शाश्वत सत्य आहे. परिवर्तनाचा स्वीकार केला की, जीवन सुखकर होते. सध्याच्या सामाजिक परिस्थितीचा विचार केला तर माणूस तसा खूप घाबरून गेलेला आहे. मात्र आपले जीवनचक्र थांबले आहे का? तर नाही. या मधूनही आपण वेगवेगळे पर्याय निर्माण करीतच आहोत.

विचार केला तर तंत्रज्ञानाने आजही आपण सर्वजण एकमेकांशी जोडलेले आहोत. काही प्रमाणात याचा उपयोग शिक्षणासाठी करता येईल का? हा विचार पुढे आला. Social Distance, या कालावधीमध्ये तो आवश्यकही होता आणि आणखी काही दिवस असणार आहे. आपल्या सर्वांच्या आयुष्यातील ही एक स्थिती आहे असे म्हणावे लागेल. मात्र किती दिवस? असे प्रश्न उपस्थित व्हायला लागले. शाळा बंद आहेत, मात्र शिक्षण सुरू राहण्यासाठी, तसेच विद्यार्थी व शिक्षक यांच्यामधील अंतर कमी करण्यासाठी ऑनलाईन शिक्षण हा एक उत्तम पर्याय म्हणावा लागेल. मूल शिकते रहावे म्हणून पालकांनीही या पर्यायाचा हळूहळू स्वीकार करायला सुरुवात केली.

> *सद्य:स्थितीत सामान्य विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण सुरू झाले आहे. तंत्रज्ञानाधारित पर्याय विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना कसा झेपेल? त्यांच्यासाठी काय करायला हवे याचा विचार सुरू झाला. 'दिक्षा लिंकच्या व्हिडिओद्वारे त्यांचे शिकणे सुरू झाले. ते सुरू करताना त्यांची अध्ययन शैली, त्यांच्या गरजा, क्षमता, आवड यांचा विचार करण्यात आला. पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि याही विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू झाले त्याविषयी...*

ऑफिसच्या ऑनलाईन कामाबरोबर शाळांचेही कामकाज आता ऑनलाईन पद्धतीने होण्यास सुरुवात झाली. मुलांची शाळेतील जागा वर्गाऐवजी स्मार्ट फोनने घेतली. याच वेळेस मनामध्ये अनेक प्रश्न डोकावू लागले. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना फोनचा उपयोग अभ्यासासाठी होऊ लागला. मग विशेष गरजाधारक विद्यार्थी मागे तर पडत नाही ना? त्यांच्यासाठी देखील ही स्थिती तशी अवघडच होती, पण पालक व शिक्षक यांच्या समन्वयातून, सुसंवादातून हा विषय हळूहळू सोप्या पद्धतीने हाताळण्यास सुरुवात झाली.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई, यांच्या दि. २६ एप्रिल २०२० च्या ई–मेल द्वारे प्राप्त सूचनेनुसार तसेच अजयजी काकडे, राज्य समन्वयक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई, यांच्याकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या मार्गदर्शनानुसार ऑनलाईन शिक्षणाचा विचार सुरू झाला.

नाशिक जिल्ह्याचा विचार केला तर प्राचार्य, डॉ. वैशाली वीर झनकर व विभाग प्रमुख, श्रीम. रत्नप्रभा भालेराव, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नाशिक यांच्या सनियंत्रणाखाली, तसेच जिल्हा सक्षमीकरण समन्वयक


बाहर है जाना कही । फिजिकल डिस्टन्स रखना सही ।

IE यांच्या मार्गदर्शनाने, समावेशित शिक्षणामध्ये विद्यार्थी व शिक्षक यातील नात्यांची वीण घट्ट करण्याचे काम विशेषज्ञ व रिसोर्स टीचर यांच्या सर्जनशील विचारातून सुरू झाले.

या पूर्वी देखील समावेशित शिक्षणामध्ये आव्हाने होती आणि आजही आहेत. मात्र त्यावर मात करून शैक्षणिक कार्य सुरू होते. आता कोविड-१९ च्या परिस्थितीत शारीरिक अंतर ठेवून शैक्षणिक कार्य करताना पूर्वानुभवाचा सहसंबंध साधून समावेशित शिक्षणामध्ये उपयोजनात्मक कार्यसंस्कृतीनुसार विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव कसे प्राप्त करून देता येतील यावर विचार करण्यात आला. विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांची अध्ययन शैली, त्यांच्या गरजा, क्षमता, आवड, यांनुसार आधी केंद्रातील विद्यार्थ्यांचे विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार वेळापत्रक तयार करण्यात आले. विद्यार्थी शिकते राहण्यासाठी काही शैक्षणिक कार्यपद्धतींची निवड करण्यात आली.

१) ज्यांना क्लासरूम सपोर्टची आवश्यकता आहे, अशा विशेष गरजा असणारे विद्यार्थ्यांचे SCERT मार्फत 'शाळा बंद शिक्षण सुरू' या उपक्रमांतर्गत 'दिक्षा' ॲपच्या मदतीने शिक्षण सुरू आहे. यालाच जोड देऊन रिसोर्स टीचरच्या मदतीने यू-ट्यूब वर उपलब्ध असलेल्या, विषयनिहाय शैक्षणिक घटकांच्या व्हिडिओ लिंक पालकांपर्यंत ऑनलाईन पोहोचविण्याचे काम प्रभावीपणे करण्यात आले. त्यामुळे पालकांमधील असुरक्षिततेची भावना कमी होण्यास मदत झाली. पालक आणि रिसोर्स टीचर यांच्यामध्ये जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित झाले. माझ्या मुलांसाठी शिक्षणाचे प्रयत्न सुरू झाले. तो शिकतो, त्याचे शिकणे सुरू रहावे, यासाठी रिसोर्स टीचर प्रयत्न करीत आहेत, याचा काहीसा दिलासा पालकांना मिळाला. जेव्हा शाळा सुरू होतील तेव्हा शाळा, शिक्षण, शिक्षक, विद्यार्थी-पालक आणि रिसोर्स टीचर, यांच्यामध्ये अधिक जवळीक व सुरक्षितता निर्माण होईल. यामधून समानतेची भावना रुजविण्यात यश येईल.

२) विशेष शिक्षकांमार्फत केंद्रनिहाय, गटनिहाय पालकांचे व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात आले. यामध्ये थोड्या प्रमाणात शैक्षणिक साहाय्याची आवश्यकता आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी नियमित शैक्षणिक अभ्यासमाला, कृतियुक्त कौशल्यांची निवड करण्यात आली. व्हॉट्सॲप ग्रुपवरून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कार्यासाठी, कौशल्य विकासासाठी support देणे सुरू झाले, online द्वारे विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या कौशल्यांच्या नोंदी घेतल्या जातात. अपूर्ण राहिलेल्या कौशल्यांचा follow up घेतल्या जातो. पालकांशी संवाद साधून प्रगतीच्या नोंदी घेतल्या जातात. याला पालक आणि विद्यार्थी त्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

३) गृह मार्गदर्शनावर आधारित शिक्षण : learning from home ही संकल्पना समावेशित शिक्षणासाठी कधीही नवीन नव्हती. बऱ्याच वर्षांपासून समावेशित शिक्षणामध्ये ती सातत्याने अवलंबिली जात आहे. या कालावधीमध्ये अध्ययनशैलीच्या विद्यार्थ्यांसाठी ती सातत्याने वापरण्यात येत आहे. समावेशित शिक्षणासाठी ही पद्धत नवीन नसल्याने कोरोना कालावधीमध्ये विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ती अधिक प्रभावी ठरत आहे. आताच्या परिस्थितीमुळे शारीरिक अंतर ठेवून पूर्वानुभवाची सांगड घालून विद्यार्थ्यांसाठी on call मार्गदर्शनाची सुविधा, रिसोर्स टीचर मार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आता on call ही शैक्षणिक पद्धत सर्वसामान्य मुलांसाठीही अवलंबिली जात आहे. विद्यार्थ्यांना on call द्वारे दैनंदिन कार्यात लागणारे कौशल्य थोड्याअधिक प्रमाणात प्राप्त करता येते. ज्यामध्ये कृती जास्त आहेत अशी कौशल्ये विद्यार्थी लवकर आत्मसात करतात.

त्या कृतींबाबत मार्गदर्शन तसेच प्रतिकारक्षमता वाढविणे, वैयक्तिक स्वच्छता, आहार यांबाबत पालकांना समुपदेशन केले जाते.

ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांबरोबर काम करीत असताना, आपण यामध्ये पालक, भावंडं, सवंगडी, त्यांच्या घराच्या परिसरात रहात असलेले वर्गमित्र, विषयमित्र अंगणवाडी ताई यांचा सहभाग करून घेत असल्याने शिक्षणप्रक्रिया अधिक सुलभ पद्धतीने होत आहे.

प्रत्येक पालकांकडे फोन आहेच असेही नाही. आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या पालकांपर्यंत रिसोर्स टीचरला काही प्रमाणात पोहोचणे क्रमप्राप्तच आहे. याबाबत देखील जिल्हा समन्वयक यांच्या मदतीने Home Schooling आराखडा रिसोर्स टीचर यांच्यामार्फत तयार करण्यात आला आहे. काळाची गरज आहे की, प्रत्येक मूल शिकते राहिले पाहिजे. याकरिता नाशिक जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये प्रत्येक विशेष तज्ज्ञ व रिसोर्स टीचर यांना केंद्रनिहाय नियोजन करून देण्यात आले आहे. व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपच्या माध्यमातून पालक-विद्यार्थी जोडले गेले आहेत. सोशल डिस्टन्स असले तरी देखील, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शिक्षणातील अंतर मात्र कमी झाले आहे. शिक्षणप्रक्रियेतून समानता पूर्ण मानवीय संबंध दृढ करणे ही एक जमेची बाजू दिसून येत आहे.

नाशिक जिल्ह्यात समावेशित शिक्षणाचे हे काम निरंतर सुरू राहण्यासाठी जिल्हा स्तरावरून याबाबत सनियंत्रण प्रभावीपणे सुरू आहे. जिल्हा स्तरावरून विभाग प्रमुख, जिल्हा समन्वयक यांच्यामार्फत विशेषज्ञ, वर्गशिक्षक, रिसोर्स टीचर, पालक यांना सातत्याने मार्गदर्शन करण्यासाठी समावेशित शिक्षण विभाग काम करीत आहे.

समावेशित शिक्षणाच्या बाबतीत सांगायचे झाले तर या काळात सोप्या संकल्पनांवर आधारित सुलभ अभ्यासक्रमाद्वारे अध्ययनशैली नुसार शैक्षणिक गरज पूर्ण करण्यासाठी, विविध छोट्याछोट्या कृतियुक्त उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

१) दैनंदिन कौशल्य विकास.
२) स्वतःशी निगडित स्वावलंबन कौशल्य.
३) बौद्धिक क्षमतेनुसार शैक्षणिक कौशल्य.
४) सूक्ष्मकारक कौशल्य.
५) ढोबळकारक कौशल्य.
६) या काळात असुरक्षिततेची भावना विद्यार्थ्यांच्या मनात गोंधळ घालत असते, त्याकरिता वर्तन सुधार कार्यक्रम आणि पालकांना समुपदेशन.
७) सामाजिक विकास कार्यक्रम समुपदेशन.
८) मूल्यसंवर्धन विकास कार्यक्रम समुपदेशन.
९) फिजिओथेरपी कार्यक्रम (सहज, सुलभ, कृती समुपदेशन)
१०) स्पीच थेरपी कार्यक्रम समुपदेशन.

विद्यार्थांच्या गरजेनुरूप अशा सर्व प्रकारच्या कौशल्यांची सांगड घालून, विद्यार्थिनिहाय शैक्षणिक कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

वरील १० कौशल्यांवर काम करण्यासाठी पालक, भावंडं यांचा सक्रिय सहभाग या कृती आराखड्यामध्ये घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काचे शिक्षण व आनंद मिळावा आणि विद्यार्थी शिकते व्हावे हा एकच उद्देश आहे. सुरुवातीला पालकांमध्ये लॉकडाऊनमुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र हळूहळू ही स्थिती निवळत गेली.

१) सुरुवातीला जेव्हा एप्रिल महिन्यात कोरोना हा विषय पुढे आला तेव्हा शाळा अनिश्चित काळापर्यंत बंद राहतील असे वाटले नव्हते.
२) जून महिना म्हटले की, सगळीकडे शैक्षणिक वातावरण व खूप उत्साह असतो. विद्यार्थी, पालक यांच्यामध्ये पुस्तके, गणवेश याची लगबग दिसून यायला लागते, नवीन प्रवेशाने शाळेचा सर्व परिसर फुलून गेलेला असतो. मात्र या वर्षी हे चित्र दुर्मिळ झाले.

३) कोरोनाचा स्वीकार व्हायला लागला आणि शिक्षणाचे पर्याय उपलब्ध होऊ लागले. जीवनशैली मध्ये तसे बदल आपल्याला करून घ्यावे लागतील ही स्वीकारात्मक भूमिका विद्यार्थी-पालक, समाजामध्ये दिसून यायला लागली. शैक्षणिक कार्य पद्धतीला विद्यार्थी आणि पालक यांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे.

याच काळात अंशतः दृष्टिदोष असलेल्या विद्यार्थ्यांसाठी लार्ज प्रिंट पाठ्यपुस्तके प्राप्त झाली आहेत. जो लाभार्थी आहे त्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या घरी ही पुस्तके पोहोचविण्यात आली आहेत. पुस्तक वाचनाचा सराव विद्यार्थ्यांची भावंडं व पालक यांच्या मदतीने होत आहे.

आज विशेष गरजा असणाऱ्या पालकांचीही व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून शैक्षणिक चर्चा घडून येताना दिसत आहे. समावेशित शिक्षणामध्ये पालकांचा सहभाग दिवसेंदिवस वाढत आहे, ही बाब समावेशित शिक्षणासाठी नक्कीच



**दृश्य अध्ययनशैलीच्या विद्यार्थ्यांकडून मुळाक्षरे गिरविण्याचा सराव.**

महत्त्वाची आहे. पालकांच्या सहकार्यानेच समावेशनाकडून शिक्षणाकडे मार्गक्रमण होत आहे. गती संथ असली तरी शिक्षण निरंतर सुरू आहे हे महत्वाचे आहे.

माझ्या बाई, माझे सर, आज मला कोणती कृती, कोणता अभ्यास देणार आहेत याची सातत्याने विद्यार्थी देखील पालकांकडे विचारणा करीत आहेत. या बाबींकडे पालक देखील उत्सुकतेने बघत आहेत. हा एक सकारात्मक बदल समावेशित शिक्षणाच्या बाबतीत दिसून येत आहे.



**येवला गटातील learning from home च्या माध्यमातून बहुअध्ययन शैलीच्या विद्यार्थ्यांचा MR kit चा कृतियुक्त सराव.**

शिक्षणासाठी शाळेच्या चार भिंती दिसून येत नसल्या तरी कौटुंबिक वातावरण तयार झाले आहे आणि हाच कौटुंबिक स्वीकार अतिशय महत्त्वाचा आहे.

समावेशित शिक्षणातील पूर्वानुभवावरून या परिस्थितीत प्रत्येकाला जीवनात येणारी आव्हाने सुलभपणे हाताळण्याची कौशल्ये प्राप्त झाली आहेत. ही परिस्थिती समावेशक शिक्षणासाठी काही वेगळी नाही. समावेशित शिक्षणामध्ये आव्हाने होतीच. यामध्ये मार्गक्रमण करून शैक्षणिक प्रवास सुरू होताच. आताही शैक्षणिक प्रवास सुरू आहे.

यामध्ये एक गोष्ट मात्र महत्त्वाची घडून येताना दिसत आहे, ती म्हणजे विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा कुटुंबातील आणि समाजातील स्वीकार आणि सहयोग. या दोघांच्या सुरेख समन्वयातून विद्यार्थ्यांचे शिक्षण होत आहे, ही बाब अतिशय महत्त्वाची आणि वाखाणण्याजोगी आहे.

# प्रिय संपादक ...

माहे जुलै २०२० चा 'जीवन शिक्षण' अंक ऑनलाईन माध्यमातून वेळेत प्राप्त झाला. प्रसंगोचित अंक असल्याचे प्रथम दर्शनीच जाणवले. अंकाचे मुखपृष्ठ अतिशय समर्पक आहे. संपादकीय मधील मुले शाळेत येत नसतील तर शिक्षण मुलांपर्यंत पोहोचवा हा संदेश अत्यंत भावला.

लोकमान्य टिळकांच्या जयंती निमित्ताने 'द्रष्टे लोकमान्य' या लेखातून त्यांच्या शैक्षणिक विचारांचा रामदास नेहुलकर यांनी घेतलेला मागोवा अभ्यासपूर्ण आहे.

मीना कारंजेकर यांचा गुरुपौर्णिमा निमित्त गुरूंविषयी कृतज्ञता व्यक्त करताना गुरू परंपरेविषयी समर्पक विचार मांडणारा 'गुरुपौर्णिमा' लेख आवडला. उमेश खोसे यांचा 'ऑनलाईन शिक्षण आणि ऑनलाईन निकाल' हा लेख वाचकांना प्रेरणा देणारा आहे. विद्यार्थ्यांनी ताणतणावाचे कसे व्यवस्थापन करावे याबद्दलचा 'गरज समुपदेशनाची' हा डॉ. रत्ना चौधरी यांचा लेख सद्य:स्थितीत अत्यंत उपयोगी आहे. डॉ. वैशाली जहागीरदार यांनी 'नवे बदल, नवे शिक्षण' या लेखात सर्वांनी कसे अपडेट रहायला हवे हे अत्यंत मार्मिकपणे मांडले आहे. 'बुद्धिमत्ता भाव' हा डॉ. संगीता महाजन यांचा लेख व डॉ. सुभाष कांबळे यांचा 'इंग्रजी विषयाच्या शिक्षकांसाठी' हा लेख आम्हां वाचकांसाठी तर माहितीची पर्वणीच आहे. अंकाच्या निर्मिती सहायक डॉ. किरण धांडे यांचे अंकाविषयीचे संकलन अत्यंत माहितीपूर्ण व वाचनीय आहे.

**श्री. जितेंद्र विजय काठोळे**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अकोला.

---

**'जीवन शिक्षण' म्हणजे 'अक्षर कल्पवृक्ष'**

प्रकाशनाच्या क्षेत्रात गेली अनेक वर्षे अनेक संस्था दीपस्तंभाप्रमाणे काम करीत आहेत. आपल्या परिषदेचे मुखपत्र 'जीवन शिक्षण' म्हणजे असाच 'अक्षर कल्पवृक्षच' होय. प्रत्येक महिन्याचा अंक वाचकांसाठी नवसंजीवनी प्रदान करीत असतो. लॉकडाऊन असतानाही अंक ऑनलाईन उपलब्ध झाला. मे महिन्याचा अंक महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या सह्याद्रीचे वारे या भाषण संग्रहातील 'सोनियाचा दिवस' हा लेख महाराष्ट्राच्या परंपरेची महती सांगतो. दिनकर पाटील, संचालक, एस.सी.ई.आर.टी., पुणे यांच्या 'कोविडच्या आव्हानात शिक्षणाची संधी' या लेखात लॉकडाऊनच्या काळातील 'शाळा बंद शिक्षण सुरू' या उपक्रमात शिक्षण विभागाने केलेल्या अभिनव उपक्रमांची माहिती दिली आहे.

'महाराष्ट्र निर्मितीचा इतिहास' 'साठीतला शैक्षणिक महाराष्ट्र' 'वेध मुलींच्या शिक्षणाचा' या विषयांवरील लेख सुद्धा अभ्यासपूर्ण, माहिती प्रधान व दिशा देणारे आहेत, याचबरोबर 'प्रतिबिंब गुणवत्ता विकासाचे', 'महाडचे बालसाहित्य संमेलन' व अनिता जावळे यांचा 'पंख अभिव्यक्तीचे' हे लेख शाळा व शाळेतील विविध उपक्रमांना स्पर्श करणारे आहेत. मला एक सांगावेसे वाटते की, 'जीवन शिक्षण' या अंकात वैचारिक, समाज प्रबोधनपर विषय तर असावेतच परंतु त्याचबरोबर ज्या-ज्या शिक्षकांनी अगदी जीव ओतून स्वतःच्या शाळेत नवीन उपक्रम, प्रयोग केले आहेत अशा लेखक शिक्षकांसाठी या कल्पवृक्षाची पाने राखून ठेवावीत कारण 'लेख' लेखकाचे 'अपत्य असते' आणि अपत्य प्राप्तीचा आनंद अवर्णनीय असतो.

कोरोनाच्या सद्य:स्थितीत सुरू होणाऱ्या शालेय जीवनाच्या प्रारंभाचा वेध घेणारे संपादकीय वाचले अन् ओठावर आले.

'जीवन शिक्षण'चे वाचन : एक अमृतानुभव!

**श्री. मंगेश देशपांडे**
पंचायत समिती बाभुळगाव, जि. यवतमाळ.



कोरोना कोरोना छळतोस का? तुझ्या तू गावाला जातोस का?



प्रत्यक्ष प्रयोगातून विज्ञान व गणिताचे मजेदार शिक्षण

# केंद्रोत्सारी बलाने फुग्यामध्ये नट व नाण्याची सर्कस

## Coin and Nut Centrifuge



१

साहित्य : गोल फुगा, पारदर्शक फुगा, नाणे व काही लहान नट.



२

प्रथम फुग्यामध्ये एक छोटा नट घाला.



३

तो फुगा मध्यम आकाराचा फुगवून घ्या व त्याचे तोंड गाठ मारून बंद करा.



४

दोन्ही हातात फुगा पकडून त्याला गोलगोल फिरवा. फुगा फिरविल्यामुळे फुग्यातील नट सुद्धा फिरेल व त्याचा आवाजही ऐकू येईल.



५

तुम्ही एकाच वेळी फुग्यामध्ये २-३ नट टाकून त्याला गोलाकार फिरविले असता प्रत्येक नट आवाज करीत गोल गोल फिरताना दिसेल.



६

हीच कृती तुम्ही एक पारदर्शक फुगा वापरून केली असता तुम्हांला फुग्यामध्ये फिरणारा नट स्पष्टपणे दिसेल.



७

आता हीच कृती नट वापरण्या ऐवजी नाणे वापरून करा. नाणे फुग्यात काळजीपूर्वक घालून फुगा मध्यम आकाराचा फुगवा.



८

यावेळी फुगा नाण्यासहित फिरविला असता फुग्यामध्ये नाणे फिरताना दिसेल परंतु नट जसा आवाज करतो तसा आवाज करणार नाही. कारण शोधा?

वैज्ञानिक / शास्त्रीय कारण : हा प्रयोग केंद्रोत्सारी बलाच्या तत्त्वावर आधारलेला आहे. कोणतीही वस्तू आपण जेव्हा बल लावून केंद्राभोवती गोल गोल फिरवितो तेव्हा ती गतीमुळे केंद्रापासून दूर जाण्याचा प्रयत्न करते, या बलाला 'केंद्रोत्सारी बल' म्हणतात. हे एक प्रकारचे अप्रत्यक्ष बल आहे व ते नेहमी केंद्रकीय बलाच्या (केंद्राच्या दिशेने काम करणारे बल) विरुद्ध दिशेने काम करते. जेव्हा आपण नट किंवा नाणे फुग्यामध्ये गोल गोल फिरवितो तेव्हा ते फुग्याच्या केंद्रापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात. फुगा गोल गोल फिरण्याचा वेग जेवढा जास्त तेवढा नट व नाणे फुग्यात फिरण्याचा वेगही जास्त. नट षटकोनी आकाराचे असल्यामुळे ते फुग्यात फिरताना त्याच्या कडा वारंवार फुग्याच्या पडद्यावर आदळतात व फुग्यामध्ये कंपने निर्माण करतात. या कंपनांमुळे ध्वनी निर्माण होऊन तो आपल्याला ऐकू येतो. जेव्हा आपण फुग्यात नाणे गोल गोल फिरवितो तेव्हा नाण्याची कडा गुळगुळीत असल्यामुळे फुग्यामध्ये फिरताना नटांएवढी कंपने निर्माण करीत नाही म्हणून आपल्याला नटांएवढा ध्वनी ऐकू येत नाही.

निर्मिती : **सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटर, आयसर, पुणे.**

'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. दिनकर पाटील यांनी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगाव बु.।।, सिंहगड रोड, पुणे-४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

Date of Publication 3 August 2020
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th of August 2020
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/57
Post Registration No.: PCW/063/2018-2020
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**




पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०–२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०–२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

प्रति ____________________

____________________

____________________

____________________